दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले | RNI No. MAHMAR/2019/82605 | वर्ष ७ वे | पाने ८ | मुल्य रू. ४.०० | अंक ३०९ | रविवार २३ ऑगस्ट २०२६
| पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 | www.rashtrasahyadri.com

# दहा लाख टन साखर आयातीला परवानगी

## भारताच्या निर्णयाने आंतरराष्ट्रीय बाजारात सुधारणा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे** : देशात साखरेचा भाव विक्रमी पातळीवर पोचल्यानंतर सरकारने आयातीचा निर्णय घेतला आहे. सरकारने ३१ ऑक्टोबरपर्यंत १० लाख कच्ची साखर आयातीला परवानगी दिली आहे. भारताच्या या निर्णयानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेच्या भावात लगेच ४ टक्क्यांची वाढ झाली आहे.

भारताने साखर आयातीवर १०० टक्के शुल्क लागू केलेले आहे. पण देशात साखरेचे उत्पादन कमी झाल्यामुळे पुरवठा कमी झाला होता. त्यामुळे बाजारात मागील दोन महिन्यांमध्ये साखरेच्या भावात तब्बल ४० टक्क्यांची वाढ झाली आहे. आता पुढील काळ साणांचा आहे. सणांमध्ये साखरेला मोठी मागणी असते. घरगुती वापर तसेच मिठाई उद्योगात साखरेचा वापर वाढतो. सणासुदीच्या काळात मागणी वाढून साखरेच्या भावात वाढ होण्याची शक्यता होती. सणांच्या काळात साखरेच्या भावातील वाढ टाळण्यासाठी सरकारने साखर आयातीचा निर्णय घेतला आहे. जवळपास दशकभरात भारत पहिल्यांदा साखरेची आयात करत आहे.

भारत सरकारने गुरुवारी (ता.२०) साखर आयातीला परवानगी दिल्यानंतर लंडनमध्ये पांढऱ्या साखरेच्या आणि न्यूयॉर्क वायद्यांमध्ये कच्चा साखरेच्या भावात ४ टक्क्यांपर्यंत वाढ दिसून आली. (पान ४ वर)

**ब्राझीलमधून आयात होणार :**
दिल्ली येथील डिलरने रॉयटर्सला दिलेल्या माहितीनुसार, साखरेची आयात प्रामुख्याने ब्राझीलमधून होण्याची शक्यात आहे. ब्राझीलमधून आयात होण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी लागू शकतो. म्हणजेच देशांतर्गत बाजारात साखरेची उपलब्धता लगेच न वाढता ऑक्टोबरपासून वाढू शकते.

**दरवाढीला लगाम बसेल?**
भारत साखर आयात करणार या बातमीने आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेचे भाव वाढले आहेत. असे असले तरी भारतातील दरवाढीला आयातीमुळे लगाम बसेल, असे बॉम्बे शुगर मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष अशोक जैन यांनी सांगितले.



# महिलांनी पिंजरा तोडावा...

## मनुस्मृतीचा दाखला देत राहुल गांधींचा हल्लाबोल

### ‘स्वत:शिवाय कोणालाही बांधिल राहू नका’
### पुण्यात ‘छात्रों की गुंज’मधून राहुल गांधींचा तरुणाईशी संवाद : ४२ हजार विद्यार्थ्यांची नोंदणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** ‘महिला कधीच स्वतंत्र राहू नये, हा मनुस्मृतीचा डाव आहे. मात्र, तुम्ही स्वत:शिवाय कोणालाही बांधिल नाही. कोणत्याही पुरुषाचा महिलांवर अधिकार नाही. महिलांनी पिंजरा तोडून स्वतंत्र व्हावे,’ असा जोरदार हल्लाबोल काँग्रेसचे लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुण्यात केला. महिलांनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश मिळवूनही त्यांना विशिष्ट चौकटीत बंदिस्त केले जात असल्याची खंत व्यक्त करताना, महिला हीच देशाची सर्वात मोठी ताकद असल्याचे गांधी म्हणाले.

पुण्यातील एआयएसएसएमएस शैक्षणिक संस्थेच्या मैदानावर आयोजित ‘छात्रों की गुंज’ या कार्यक्रमात राहुल गांधी तरुणाईशी संवाद साधत होते. ‘पिंजरा तोडा’ ही या कार्यक्रमाची संकल्पना होती. ‘मी येथे राजकारणावर बोलण्यासाठी आलेलो नाही,’



असे स्पष्ट करत गांधी यांनी विद्यार्थीनींच्या अनुभवांना आणि महिलांच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवले.

शिक्षणापासून रोजगारापर्यंत मुलींना भेदभावाला सामोरे जावे लागत असल्याचे सांगत गांधी म्हणाले की, सार्वजनिक ठिकाणी प्रवास करताना महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. कुटुंब आणि समाजाकडून मुलींवर लादल्या जाणाऱ्या बंधनांमुळे त्यांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा येतात. मुलींनी स्वतंत्र असणे हे भारताच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भारताची ताकद नेमकी काय, याची प्रत्येकजण आपल्या परीने व्याख्या करतो. मात्र, देशातील सुमारे ७० कोटी तरुणांची स्वप्ने, विचार आणि क्षमता हीच भारताची खरी ताकद आहे, असे राहुल गांधी यांनी सांगितले. तरुणांची मोठी लोकसंख्या ही देशासाठी संधी असून, या शक्तीला योग्य दिशा आणि स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान काही विद्यार्थीनींनी राहुल गांधी यांच्यासमोर आपले अनुभव मांडले. शिक्षण घेताना, नोकरी करताना तसेच सार्वजनिक ठिकाणी वावरताना महिलांना येणाऱ्या अडचणी त्यांनी सांगितल्या. महिलांना आर्थिक आणि सामाजिक पातळीवरही अनेक प्रकारच्या बंधनांना सामोरे जावे लागत असल्याचे या अनुभवांतून समोर आले.देशातील महिलांच्या स्थितीवर भाष्य करताना राहुल गांधी यांनी महिला अत्याचार, आर्थिक हिंसाचार आणि वेतनातील असमानतेचे मुद्दे उपस्थित केले. देशात पुरुषांच्या तुलनेत (पान ४ वर)

### ‘धमकावतील, घाबरवतील; पण लढत राहा!’

पुणे दौऱ्यात ‘छात्रों की गुंज’ कार्यक्रमापूर्वी राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील प्रमुख काँग्रेस नेत्यांची स्वतंत्र बैठक घेतली. या बैठकीत राज्यातील सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. पुण्यात विद्यार्थ्यांशी संबंधित कालच्या घटनेचीही राहुल गांधी यांनी सुरुवातीलाच संपूर्ण माहिती घेतली. माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, प्रणिती शिंदे, सतेज पाटील, माजी महिला व बाल कल्याण मंत्री यशोमती ठाकूर, युवा काँग्रेस नेते कन्हैया कुमार, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सचिव रेहाना चिस्ती उपस्थित होते. बैठकीत काँग्रेस नेत्यांना मार्गदर्शन करताना, ‘तुम्हाला धमकावण्याचा, घाबरवण्याचा प्रयत्न केला जाईल; मात्र तुम्ही लढत राहा,’ असा संदेश राहुल गांधी यांनी दिल्याचे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सांगितले.

### ‘स्कूल ठीक करो’ अभियान...

## औसा शाळेची बदनामी केल्याप्रकरणी दिपकेंसह सहा जणांवर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लातूर :** जिल्ह्यातील औसा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक उर्दू शाळेत अनधिकृत प्रवेश करून चित्रीकरण करत शाळेची बदनामी केल्याप्रकरणी ‘क्रोकोच जनता पार्टी’चे अध्यक्ष अभिजीत दिपके यांच्यासह सहा जणांवर औसा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिपके यांच्या ‘स्कूल ठीक करो’ अभियानादरम्यान हा प्रकार घडला.

२० ऑगस्ट रोजी दुपारी सव्वा एकच्या सुमारास दिपके, अजिंक्य शिंदे आणि अन्य चार ते पाच जण शाळेत गेले. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये बसून विविध प्रश्न विचारले. यावेळी शिक्षकांच्या शैक्षणिक व शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा आरोप आहे. तसेच शाळेची(पान ४ वर)

# अहिल्यानगरमध्ये ७८ उद्योगांची १३ हजार कोटींची गुंतवणूक



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळण्याची चिन्हे निर्माण झाली असून, जिल्ह्यातील ७८ उद्योजकांनी सुमारे १३ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यासाठी उद्योग विभागाशी करार केले आहेत. या गुंतवणुकीमुळे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होण्याबरोबरच औद्योगिक क्षेत्राला नवा आत्मविश्वास मिळणार आहे. जिल्ह्यात उद्योगांसाठी पोषक वातावरण तयार झाले असून, उद्योजकांनी निर्भयपणे गुंतवणूक करावी, असे आवाहन जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

राज्य शासनाच्या उद्योग विभागाच्या वतीने अहिल्यानगर येथे गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील ७८ उद्योगांशी उद्योग विभागाच्या माध्यमातून करार करण्यात आले. या करारांमधून सुमारे १३ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. यावेळी सर्व उद्योजकांचा मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

**औद्योगिक विकासाला मोठी चालना**

औद्योगिक वातावरणात सकारात्मक बदल

उद्योजकांशी संवाद साधताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, अहिल्यानगर जिल्हा आता महत्त्वाचे औद्योगिक केंद्र म्हणून पुढे येत आहे. यापूर्वी जिल्ह्यात औद्योगिक विकासाबाबत काहीसे नकारात्मक वातावरण होते. त्यामुळे उद्योग जिल्ह्यात येण्यास अडचणी निर्माण होत होत्या. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत असून त्याचा सकारात्मक परिणाम अहिल्यानगर जिल्ह्यावरही होत आहे.

उद्योजकांना सुरक्षित वातावरण, आवश्यक पायाभूत सुविधा आणि कामगारांना संरक्षण मिळणे आवश्यक आहे. उद्योगांना कोणत्याही प्रकारची भीती वाटणार नाही, असे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी उद्योग विभागाने स्वीकारली पाहिजे, असेही विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

विमानतळ, कार्गो हब अन् सेमीकंडक्टर प्रकल्प

अहिल्यानगर जिल्हा छत्रपती संभाजीनगर आणि पुणे या मोठ्या औद्योगिक पट्ट्यांना जोडणारे महत्त्वाचे केंद्र बनत आहे. जिल्ह्यात रस्ते विकासाची कामे सुरू असून शिर्डी विमानतळाचा विस्तार होत आहे. भविष्यात शिर्डी विमानतळाच्या माध्यमातून कार्गो हब निर्माण (पान ४ वर)

**संरक्षण उत्पादन क्षेत्राला चालना**
जिल्ह्यात औद्योगिक विकासासाठी जागांची उपलब्धता करून दिल्यानंतर निबे ग्रुपच्या माध्यमातून पहिला संरक्षण उत्पादन प्रकल्प साकारत आहे. भविष्यात बेलवंडी आणि हरेगाव येथेही संरक्षण उत्पादनाचे प्रकल्प कार्यान्वित होणार असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. यापूर्वी अशा प्रकारचे प्रयत्न जिल्ह्यात झाले नसल्याने औद्योगिक विकासाच्या बाबतीत जिल्हा मागे राहिला. धाक-दडपशाहीमुळे काही उद्योग जिल्ह्यातून माघारी गेल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

**युवक, महिलांसाठी संधी**
सूक्ष्म व लघु उद्योगांपासून मोठ्या उद्योगांपर्यंत गुंतवणुकीसाठी युवक आणि महिला पुढे येत असल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले. गुंतवणुकीची रक्कम किती कोटींची आहे, यापेक्षा तरुण उद्योजकांनी दाखविलेल्या धाडसाला अधिक महत्त्व आहे. या गुंतवणुकीमुळे स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी वाढून तरुणांना आपल्या जिल्ह्यातच रोजगार व व्यवसायाच्या नव्या संधी उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## नान्नजचे प्राथमिक आरोग्य केंद्र बॉम्बने उडवून देण्याची धमकी

### कृष्णा राजपूत विरुद्ध गुन्हा : वैद्यकीय अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांना शिवीगाळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील नान्नज येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांशी हुज्जत घालत शिवीगाळ करणाऱ्या व्यक्तीने ‘बॉम्ब टाकून दवाखाना उडवून देईन, तुम्हाला जीव मारून टाकीन,’ अशी धमकी दिल्याचा प्रकार शुक्रवारी (दि. २१) सकाळी साडेअकराच्या सुमारास घडला. या घटनेमुळे आरोग्य केंद्रातील कर्मचारी तसेच रुग्णांमध्ये काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी वैद्यकीय अधिकारी यांच्या फिर्यादीवरून कृष्णा प्रकाशसिंग राजपुत (रा. नान्नज, ता. जामखेड) याच्याविरुद्ध जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, २१ ऑगस्ट रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास नान्नज प्राथमिक आरोग्य केंद्रातील ओपीडीमध्ये रुग्णांवर उपचार सुरू होते. ओपीडी जी.एन.एम. परिचारिका या रुग्णांना सलाईन लावत असताना कृष्णा राजपुत आरोग्य केंद्रात आला.

यावेळी ‘खोटा रिपोर्ट का देता?’ असे म्हणत त्याने आरोग्य कर्मचाऱ्यांशी वाद घालण्यास सुरुवात केली. त्यानंतर मोठमोठ्याने शिवीगाळ केल्याने ओपीडीतील वातावरण तणावपूर्ण झाले. परिस्थिती पाहून वैद्यकीय अधिकारी यांनी ओपीडीमधून बाहेर येत राजपुत यांना, ‘दादा, येथे इतर रुग्ण आहेत. त्यांना त्रास होत आहे. तुम्ही बाहेर थांबा,’ असे सांगितले. मात्र, याचा राग आल्याने राजपुत याने वैधकिय अधिकारी आणि परिचारिका यांना शिवीगाळ (पान ४ वर)

## अहिल्यानगर जिल्ह्यात वर्षातील पहिली ‘मकोका’ कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सराईत गुन्हेगारांच्या टोळीवर पोलिसांचा प्रहार**

**नगर तालुका :** दरोडा, जबरी चोरी, घरफोडी आणि दुखापतीसारखे गंभीर गुन्हे करून सर्वसामान्यांच्या जीवितासह मालमत्तेला धोका निर्माण करणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीविरुद्ध अहिल्यानगर पोलिसांनी वर्षातील पहिली मोठी मोक्का कारवाई केली आहे. संघटितपणे गुन्हे करणाऱ्या या टोळीविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम ांतर्गत कठोर कारवाई करण्यात आली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, पारनेर पोलीस ठाणे हद्दीतील करंदी येथे २४ फेब्रुवारी २०२६ रोजी घरात अनोळखी चोरट्यांनी प्रवेश करून मारहाण करत सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली होती. या प्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान सदर गुन्ह्यातील आरोपींची नावे निष्पन्न झाली असून त्यांना अटक करण्यात आली आहे. तपासात आरोपींच्या टोळीने यापूर्वीही अहिल्यानगर तसेच पुणे जिल्ह्यात दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, दुखापत आदी गंभीर स्वरूपाचे एकूण १२ गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले. या गुन्ह्यांमुळे नागरिकांच्या जीवितासह मालमत्तेला मोठा धोका निर्माण झाला असल्याने टोळीविरुद्ध मोक्का कायद्यानुसार कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला.

पोलिसांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली या टोळीविरुद्ध ठोस पुरावे संकलित करून मोक्का न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. त्यानंतर आरोपी विशाल उर्फ कोंग्या नरेश काळे व त्याच्या साथीदारांविरुद्ध मोक्का कायद्यान्वये (पान ४ वर)

# एलआयसी ग्राहकाच्या पॉलिसीवर परस्पर 10 लाखांचा डाका

## जामखेड शाखेतील प्रकार : बनावट कागदपत्रांच्या आधारे कर्ज लाटले

### १ सप्टेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या (एलआयसी) जामखेड शाखेत ग्राहकाचा विश्वासघात करून त्यांच्या नकळत पॉलिसीवर तब्बल १० लाख रुपयांचे कर्ज उचलून आर्थिक अपहार केल्याची अत्यंत गंभीर घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पीडित पॉलिसीधारकाने जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, तहसीलदार व जामखेड पोलिसांकडे तक्रार अर्ज देऊन दोषींवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, जामखेड तालुक्यातील वाघा येथील रहिवासी महेंद्र आजिनाथ बारस्कर यांची एलआयसीची २५ लाख रुपयांची पॉलिसी (क्र. ९५८५५४४३०) आहे. या पॉलिसीवर बारस्कर यांची कोणतीही संमती नसताना, कोणत्याही लोन फॉर्मवर सही अथवा अंगठा घेतलेला नसताना तसेच मूळ पॉलिसी बॉण्ड जमा केलेला नसताना परस्पर १० लाख रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले.

चौकशीदरम्यान १९ एप्रिल २०२२ रोजी ही कर्जाची रक्कम एलआयसी जामखेड शाखेतील कर्मचारी सचिन छगन शिंदे यांच्या भारतीय स्टेट बँक खात्यात वर्ग करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यावरून एलआयसी कर्मचारी व इतर संबंधित व्यक्तींनी संगनमत करून बनावट कागदपत्रांच्या आधारे हा आर्थिक अपहार केल्याचा थेट आरोप अर्जात करण्यात आला आहे.विनासंमती कर्जासाठी वापरण्यात आलेल्या लोन फॉर्म, केवायसी कागदपत्रे, बनावट स्वाक्षरी व अंगठ्याच्या ठशांची सखोल न्यायवैद्यक तपासणी व्हावी. १९ एप्रिल २०२२ रोजी बँकेत झालेला संपूर्ण व्यवहार व खात्यांची चौकशी करण्यात यावी.

एलआयसी कर्मचारी सचिन छगन शिंदे व यात सहभागी असलेल्या इतर अधिकाऱ्यांवर फसवणूक, विश्वासघात व बनावट कागदपत्रे बनवल्याप्रकरणी तात्काळ गुन्हा नोंदवण्यात यावा.बेकायदेशीरपणे काढलेले हे कर्ज तात्काळ रद्द करून ग्राहकाची पॉलिसी पूर्वस्थितीत आणली जावी. या प्रकरणाचा अधिकृत चौकशी अहवाल व मूळ कागदपत्रांची प्रत तक्रारदारास मिळावी. अशी मागणी मूळ पॉलिसीधारकाने तक्रार अर्जात केली आहे.

**हा माझ्या आर्थिक हितावर झालेला थेट दरोडा असून यामुळे माझे मोठे नुकसान झाले आहे, अशी उद्विग्न प्रतिक्रिया महेंद्र बारस्कर यांनी दिली. प्रशासनाने येत्या ८ दिवसांत यावर योग्य ती कायदेशीर कारवाई न केल्यास, येत्या १ सप्टेंबर २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही व सनदशीर मार्गाने आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा त्यांनी अर्जाद्वारे दिला आहे.**

# बाळांनो... आई-वडील महत्वाचे, आयफोन नाही !

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

-----------

**खवड्या डोंगरावरील दुर्घटना हा केवळ एका कुटुंबाचा अंत नाही; तो बदलत्या पालकत्वाचा, मुलांच्या मानसिकतेचा आणि समाजाच्या दिशेचा गंभीर इशारा आहे...**

------

खवड्या डोंगरावर घडलेल्या हृदयद्रावक घटनेने महाराष्ट्र हादरला. एका अकरावीत शिकणाऱ्या मुलाने घेतलेल्या टोकाच्या निर्णयानंतर त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात वडिलांचा आणि त्यानंतर आईचा झालेला मृत्यू मन सुन्न करणारा आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर मृत संगीता चांदगुडे यांचा घटनेच्या आदल्या रात्रीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्या व्हिडिओतील कौटुंबिक नात्यांवरील भाष्यामुळे विविध तर्क-वितर्क सुरू झाले आहेत. मात्र, त्या व्हिडिओचा या घटनेशी थेट संबंध होता, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. नेमके कारण तपासातूनच स्पष्ट होईल.

पण या घटनेने उपस्थित केलेले प्रश्न मात्र तपासाच्या पलीकडचे आहेत. आपल्या मुलांना आपण नेमके काय देतोय? सुख-सुविधा की जगण्याची ताकद? महागडे गॅझेट की भावनिक आधार? स्पर्धेची सवय की अपयश पचवण्याची क्षमता?

आजच्या जेन-झी पिढीकडे जग त्यांच्या हातातील मोबाईलमध्ये आले आहे. माहितीचा महासागर, मनोरंजनाची असंख्य साधने, सोशल मीडिया, महागडी गॅझेट्स आणि सतत बदलणारी जीवनशैली यामुळे मुलांचे जग पालकांच्या बालपणापेक्षा पूर्णपणे वेगळे झाले आहे. ही पिढी दोषी आहे, असे सरसकट म्हणणे अन्यायकारक आहे. मात्र, या पिढीला घडवताना आपण कुठे कमी पडतोय, हा प्रश्न प्रत्येक पालकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.

आज अनेक घरांत पालक दिवसभर कष्ट करतात. मुलांना आपल्यापेक्षा चांगले आयुष्य मिळावे, त्यांनी आपल्यासारखे कष्ट करू नयेत, म्हणून ते शक्य ते सर्व देतात. पण अनेकदा प्रेमाची जागा वस्तू घेतात. मुलाने हट्ट केला की त्याच्या हातात नवे गॅझेट दिले जाते. त्याला नकार दिला जात नाही. कारण पालकांकडे वेळ नसतो, संवादासाठी ऊर्जा नसते किंवा मुलाच्या नाराजीला सामोरे जाण्याची मानसिक तयारी नसते. इथूनच अति लाडाची सुरुवात होते. मुलाला प्रत्येक गोष्ट मिळत गेली की 'नाही' हा शब्द त्याच्यासाठी असह्य होऊ लागतो. अपेक्षा वाढतात. तुलना वाढते. सोशल मीडियावरील आभासी जीवनाशी स्वतःची तुलना सुरू होते. दुसऱ्याकडे महागडा मोबाईल आहे, आपल्याकडे का नाही? दुसरा मुलगा महागड्या गाडीवर फिरतो, आपण का नाही? मित्राला एवढे स्वातंत्र्य आहे, मला का नाही? अशा प्रश्नांमधून असमाधान वाढत जाते. यातच आत्मकेंद्री वृत्तीची बीजे रुजतात.

मात्र, या आत्मकेंद्रीपणाला केवळ मुलांना दोष देऊन चालणार नाही. त्यांना 'तू महत्त्वाचा आहेस' हे सांगताना 'फक्त तुझ्याच इच्छा महत्त्वाच्या नाहीत' हे सांगण्याचे कामही पालकांचे आहे. घरात संवाद कमी झाला आहे. मुलगा काय खातो, किती शिकतो, किती गुण मिळवतो याची माहिती पालकांना असते; पण तो आतून काय अनुभवतो, कोणत्या मित्रांच्या सहवासात आहे, त्याला कोणत्या गोष्टीची भीती वाटते, तो कोणत्या तणावातून जातो, त्याच्या मनात कोणता राग किंवा असुरक्षितता आहे, हे किती पालकांना माहीत असते?

ही दरी धोकादायक आहे. मोबाईलच्या पडद्यावर मुलांचा वेळ वाढत असताना घरातील प्रत्यक्ष संवाद कमी होत आहे. सोशल मीडिया, ऑनलाइन गेमिंग, व्यसनाधीन करणारे डिजिटल कंटेंट, तंबाखू-गुटखा, मद्य किंवा इतर व्यसनांची संगत आणि चुकीच्या मित्रपरिवाराचा प्रभाव या सगळ्यांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. प्रत्येक मोबाईल वापरणारा मुलगा चुकीच्या मार्गावर जातो असे नाही; परंतु नियंत्रण, संवाद आणि विश्वास नसलेले डिजिटल स्वातंत्र्य धोकादायक ठरू शकते. याच वयात शिक्षणाचा ताणही असतो. दहावी-बारावीचे वर्ष म्हणजे अनेक कुटुंबांत भविष्याचा निर्णायक टप्पा मानला जातो. अपेक्षा वाढतात. गुण, प्रवेश, स्पर्धा परीक्षा, करिअर आणि इतरांशी तुलना यामुळे मुलांच्या मनावर मोठा दबाव येऊ शकतो.

या संकटाची व्याप्ती आकडेवारीतूनही दिसते. राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या २०२३ च्या अहवालानुसार भारतात १३,८९२ विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांची नोंद झाली, जी एकूण आत्महत्यांपैकी ८.१ टक्के होती. २०२२ मध्ये हा आकडा १३,०४४ होता. महाराष्ट्रात २०२३ मध्ये विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांची संख्या २,०४६ नोंदली गेली. १४ ते १८ वर्षांच्या मुलांबाबत उपलब्ध सरकारी आकडेवारी अत्यंत अस्वस्थ करणारी आहे. २०१७ ते २०१९ या तीन वर्षांत १४ ते १८ वयोगटातील २४,५६८ मुलांनी आत्महत्या केली. त्यात १३,३२५ मुली होत्या. २०१७ मध्ये ८,०२९, २०१८ मध्ये ८,१६२ आणि २०१९ मध्ये ८,३७७ अशी वर्षनिहाय संख्या होती. याच काळात परीक्षेत अपयश हे कारण म्हणून ४,०४६ प्रकरणांत नोंदले गेले. ही आकडेवारी केवळ आकडे नाहीत. प्रत्येक आकड्यामागे एक घर आहे. आई-वडील आहेत. स्वप्ने आहेत. आणि अपूर्ण राहिलेली एक कहाणी आहे.

म्हणूनच खवड्या डोंगराची घटना केवळ 'मुलाचा हट्ट' म्हणून संपवणेही चुकीचे आणि केवळ 'पालकांची चूक' म्हणून दोषारोप करणेही चुकीचे. मुलांचे मानसिक विश्व समजून घेण्यासाठी घर, शाळा, मित्रपरिवार आणि समाज या सर्वांनी एकत्रित जबाबदारी स्वीकारण्याची गरज आहे.पालकांनी मुलांना प्रत्येक मागणी पूर्ण करून देण्यापेक्षा काही मागण्या नाकारण्याची सवय लावावी. त्यांना अपयश स्वीकारायला शिकवावे. राग आला, दुःख झाले, नात्यात तणाव आला किंवा एखादी इच्छा पूर्ण झाली नाही, तरी जीवन थांबत नाही हे समजावून सांगावे.

आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मुलांशी बोलावे. फक्त अभ्यासाबद्दल नाही. फक्त गुणांबद्दल नाही. फक्त करिअरबद्दल नाही. त्यांच्या मनाबद्दल बोलावे. त्यांना विचारावे की, तू आनंदी आहेस ना? काही त्रास आहे का? कोणी तुला त्रास देतंय का? तुला माझ्याशी काहीही बोलायचं असेल तर मी तुझ्यासोबत आहे. कदाचित अशा साध्या वाक्यांमधून एखादे आयुष्य वाचू शकते.

जेन-झी पिढीला दोष देण्यापेक्षा या पिढीला समजून घेण्याची गरज आहे. कारण मुलांच्या हातातील मोबाईल बदलणे आपल्या हातात नसले, तरी त्या मोबाईलच्या पलीकडे त्यांच्यासाठी एक विश्वासाचे घर निर्माण करणे आपल्या हातात आहे. आई-वडील आयुष्यभर मुलांसाठी धडपडतात. मुलांनीही त्यांचे प्रेम, त्याग आणि कष्ट समजून घ्यावेत, ही अपेक्षा स्वाभाविक आहे. पण त्यासाठी भीती नव्हे, संवाद हवा; दबाव नव्हे, विश्वास हवा; अति लाड नव्हे, संस्कार हवेत.

खवड्या डोंगरावरील तीन जीवांचा अंत आपल्याला हा एकच मोठा धडा देतो. मुलांना जग जिंकण्याची स्वप्ने जरूर द्या; पण त्याआधी त्यांना आयुष्यातील पराभव सहन करण्याची ताकद द्या. त्यांच्या हातात महागडा फोन देण्यापूर्वी त्यांचा हात हातात घ्या. कारण आयफोन हरवला तर नवा घेता येतो. पैसा गेला तर पुन्हा कमावता येतो. गुण कमी पडले तर पुन्हा प्रयत्न करता येतात पण आई-वडील आणि मुलाचे आयुष्य परत मिळत नाही.

आता तरी आपण थांबूया. मुलांकडे पाहूया त्यांच्याशी बोलूया आणि स्वतःला विचारूया की, आपण मुलांसाठी आयुष्य घडवतोय की त्यांना आयुष्यापेक्षा वस्तू महत्त्वाच्या वाटतील, अशी दुनिया घडवतोय? एकदा अंतर्मुख होऊन विचार करा..!

# पानोडी ग्रामसभेत विकासकामांवर खल

## युरिया खताच्या मुद्द्यावर ग्रामस्थ आक्रमक



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील व शिर्डी विधानसभा मतदारसंघातील पानोडी येथे ग्रामसभा उत्साहात पार पडली. गावाच्या विकासाशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण ठराव यावेळी मंजूर करण्यात आले. तसेच स्थानिक प्रश्नांवरून ग्रामस्थांनी प्रशासनाला धारेवर धरले.

प्रशासक गणपत हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामसभेचे नियोजन करण्यात आले होते. ग्रामसेवक रजेवर असल्याने सचिवपद व सभेच्या संचलनाची जबाबदारी जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका शुभांगी गोडसे यांनी सांभाळली.

ग्रामसभेत जलजीवन योजना हस्तांतरित न करणे, रेशनकार्डधारकांना नियमित धान्यपुरवठा करणे, गावातील जुनी शाळा इमारत व धर्मशाळेचे निर्लेखन करणे, गोशाळेतील वासरांचा योग्य सांभाळ करणे तसेच शेतीसाठी लोडशेडिंग बंद करण्याबाबत ठराव मंजूर करण्यात आले. शिर्डी-पुणे रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरणारी पुरातन वेस काढण्याबाबतही एकमताने निर्णय घेण्यात आला. ग्रामस्थांच्या आरोग्यासाठी 'माझे गाव, माझे आरोग्य' ही संकल्पना राबविण्याचे निश्चित करण्यात आले.

दरम्यान, सोसायटीने युरिया खताचा साठा वाटपासाठी का घेतला नाही, या प्रश्नावरून ग्रामस्थ आक्रमक झाले. या मुद्द्यावर सभेत काही काळ गदारोळ झाला. महादू खेडकर यांची विहीर खचल्याने त्यांना मदत मिळावी, याबाबतही ठराव मंजूर करण्यात आला.

गावात प्रशासक राजवट असल्याने मूलभूत सुविधा निर्माण करताना अडचणी येत असल्याचे विक्रम थोरात यांनी सांगितले. परिसरातील पोल्ट्री व्यवसायामुळे माशांचा प्रादुर्भाव वाढल्याची तक्रारही ग्रामस्थांनी केली. याची दखल घेत संबंधित पोल्ट्रीचालकांना नोटिसा बजावून कडक कारवाई करण्याचे आश्वासन ग्रामपंचायतीने दिले.

यावेळी विक्रम थोरात, रावसाहेब घुगे, अशोक तळेकर, बबन कराड, राजेंद्र जाधव, रामनाथ पवार, भाऊसाहेब चव्हाण, जीवन कदम, बाळासाहेब सानप, बळवंतराव थोरात, गणेश कदम, भारत शेवाळे यांच्यासह कृषी अधिकारी स्वप्नील पाटील, आरोग्य विभागाचे अधिकारी-कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बेलापूर ग्रामीण पत्रकार संघाकडून थोरातांवरील हल्ल्याचा निषेध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** – अहिल्यानगर येथील साम टीव्ही चे प्रतिनिधी सुशील थोरात यांच्या वर झालेल्या भ्याड हल्ल्याचा बेलापूर ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने तीव्र शब्दात निषेध करण्यात आला आहे. दुचाकीचा धक्का लागल्याच्या कारणावरून थोरात यांना मारहाण करण्यात आली आहे. गुंडांनी मारहाण करून त्यांच्यावर जीवघेणा हल्ला केला आहे. हल्ल्यात पत्रकार थोरात गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पत्रकारांवर वारंवार होणारे हल्ले ही बाब लोकशाहीसाठी धोक्याची आहे. हल्लेखोर गुंडांवर तातडीने कायदेशीर कडक कारवाई करून त्यांना शिक्षा द्यावी, अशी मागणी बेलापूर ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम नाईक यांनी केली आहे. पत्रकार संरक्षण कायदा अस्तित्वात असूनही त्याची अंमलबजावणी होत नसल्याची खंत पत्रकार संघाचे कोषाध्यक्ष हाजी शफीक बागवान यांनी व्यक्त करत पत्रकारांच्या सुरक्षेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान या घटनेचा बेलापूर पत्रकार संघाचे अध्यक्ष मारोतराव राशिनकर, बेलापूर ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम नाईक, कोषाध्यक्ष हाजी शफीक बागवान, सदाशिव नागले, भीमराज हुडे, अशोक शेलार,सुनील नवले, अरविंद शहाणे, सतीश काळे, प्रसाद खरात, प्रेस फोटोग्राफर अतीश देसरडा, रुपेश सिकची, बाबासाहेब शेलार, दीपक काळे, गोविंद साळुंके, शकील शेख, भारत थोरात, आदी बेलापूर पंचक्रोशीतील पत्रकारांनी तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे.

# सफाई कामगारांना न्याय मिळत नसल्याने राहुरी नगरपरिषदेवर मोर्चा



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : भारत स्वातंत्र्य होऊन ८० वर्षे झाले, मात्र सफाई कामगारांना न्याय मिळत नसल्याने आजही पारतंत्र्यात असल्याचे दिसत आहे. मात्र आता अन्याय सहन केला जाणार नाही. असा सज्जड इशारा सफाई कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष तानसेन बिवाल यांनी दिला.

वारस हक्काची नोकरी मिळविण्यासाठी दोन महिलांनी आपल्या कुटुंबासह राहुरी नगरपरिषद कार्यालया समोर दि. १४ ऑगस्ट २०२६ पासून आमरण उपोषण सुरु केले आहे. उपोषणाला आठ दिवस झाले. नगरपरिषद प्रशासनाने अद्याप कोणतीही दखल घेतली नाही. या घटनेच्या निषेधार्थ दि. २१ ऑगस्ट रोजी सकाळी तानसेन बिवाल यांच्या नेतृत्वाखाली सफाई कामगारांनी शहरातून झाडू मोर्चा काढला होता. त्यानंतर सर्व आंदोलन कर्ते नगरपरिषद कार्यालयात गेले. यावेळी तानसेन बिवाल यांनी नगरपरिषद प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. बिवाल म्हणाले, सफाई कामगार पदावर कार्यरत असलेले कर्मचारी श्याम अमीर बिवाल यांचा सन १९८४ मध्ये सेवा काळात मृत्यू झाला होता. त्यांच्या रिक्त जागेवर त्यांच्या पात्र वारसदार पत्नी शीला श्याम बिवाल यांनी आपल्या कुटुंबातील जवळच्या नातेवाईक आणि अंतिम नामनिर्देशित सून ज्योती मनीष सोलंकी यांना वारस हक्काने नोकरी मिळण्याकरिता सर्व आवश्यक कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता कार्यालयाकडे केलेली आहे. मात्र अद्याप त्यांची नियुक्ती झाली नाही. गेल्या आठ दिवसांपासून उपोषणामुळे त्यांची प्रकृती खालावली आहे. नगरपरिषद प्रशासनाने त्यांची ताबडतोब नियुक्ती केली नाहीतर २४ ऑगस्ट रोजी नगरपरिषद कार्यालयात कचरा व मैला फेक आंदोलन करण्याचा इशारा तानसेन बिवाल यांनी दिला. प्रसंगी वंचितचे प्रदेश उपाध्यक्ष अनिल जाधव, तालुकाध्यक्ष बाळासाहेब जाधव, नगरपरिषदचे विरोधी पक्षनेते अरुण साळवे यांनी आपले मनोगत व्यक्त करुन प्रशासनावर टिका केली.

प्रसंगी मुख्याधिकारी विद्या पाटील यांनी सांगीतले, सदर रिक्त जागे बाबत एकुण पाच अर्ज नगरपरिषद प्रशासनाकडे आले आहेत. या बाबत सविस्तर माहिती घेऊन योग्य ती कारवाई करण्यात येईल.

# भास्करगिरी महाराज, उद्धव महाराज यांची केशव गोविंद भगवान सप्ताहास भेट



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** : बेलापूर येथील हरिहर केशव गोविंद भगवान मंदिरात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व कीर्तन महोत्सवास श्रीक्षेत्र देवगडचे मठाधिपती भास्करगिरीजी महाराज तसेच महंत उद्धव महाराज मंडलिक यांनी भेट देऊन सदिच्छा व्यक्त केल्या. दरवर्षी भक्तिभावाने आयोजित करण्यात येणाऱ्या या सोहळ्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. केशव गोविंद मंदिरात सुरू असलेल्या सप्ताहास भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आज रविवारी ह.भ.प. अनिल महाराज पाटील यांचे कीर्तन होणार आहे. श्रावणातील दुसऱ्या सोमवारी परंपरेनुसार पुणतांबा येथून कावड यात्रेद्वारे गोदाजल आणून हरिहर केशव गोविंद भगवान यांना जलाभिषेक करण्यात येणार आहे. दुपारी तीन वाजता शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी ह.भ.प. मुकुंदकाका जाटदेवळेकर यांचे कीर्तन होईल. मंगळवारी सकाळी दहा वाजता ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कदम यांचे काल्याचे कीर्तन, त्यानंतर महाआरती व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होणार आहे. भाविक व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सप्ताह समितीने केले आहे.

# कारेगाव सोसायटीत तीन संचालकांच्या अपात्रतेची मागणी

## जिल्हा बँकेच्या ठरावासाठी संचालकाचा राजीनामा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील कारेगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीनंतर संचालकांच्या पात्रतेसह निवडणूक प्रक्रियेवर विविध आक्षेप घेण्यात आले आहेत. तीन संचालकांना अपात्र घोषित करण्यासह थकीत कर्जदार, अक्रियाशील व पात्रता न पूर्ण करणाऱ्या सभासदांच्या मतदानाची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

लोकसेवा विकास मंडळाच्या पॅनलमधील उमेदवारांनी याबाबत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, श्रीरामपूर यांच्याकडे तक्रारी दाखल केल्या असून, कार्यालयाने संस्थेच्या सचिवांकडून अहवाल मागविला आहे. तीन संचालकांच्या पात्रतेवर आक्षेप मच्छिंद्र रंगनाथ उन्डे, नानासाहेब राजाराम गोरे आणि जालिंदर भाऊसाहेब होले या तीन संचालकांच्या पात्रतेवर तक्रारदारांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या कर्जखात्यांची स्थिती, थकबाकीची तारीख व निवडणुकीच्या वेळीची पात्रता अधिकृत कागदपत्रांच्या आधारे तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच थकीत कर्जदार सभासदांनी मतदान केले का, तसेच अक्रियाशील व पात्रता पूर्ण न करणाऱ्या सभासदांचा मतदार यादीत समावेश झाला का, याचीही चौकशी करण्याची मागणी आहे. या प्रक्रियेत संस्थेच्या सचिवांची भूमिकाही तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. दीपक पटारे यांचा राजीनामा दरम्यान, संस्थेचे संचालक दीपक शिवराम पटारे यांनी जिल्हा बँकेच्या ठरावासाठी स्वतः हून संचालकपदाचा राजीनामा दिल्याची बाब समोर आली आहे. न्यायालयातही दावा या निवडणूक प्रक्रियेतील आक्षेपांच्या अनुषंगाने न्यायालयातही दावा दाखल करण्यात आला आहे. तक्रारींच्या प्रती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर तसेच विभागीय सहनिबंधक, नाशिक विभाग यांच्याकडेही देण्यात आल्या आहेत. आता सहकार विभागाचा अहवाल आणि न्यायालयीन कार्यवाहीकडे सभासदांचे लक्ष लागले आहे.

# 'अशोक' वर प्रशासक नेमा ; साखर आयुक्तांना प्रताप भोसले यांचे पत्र



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : अशोक सहकारी साखर कारखान्याच्या आर्थिक स्थितीवर गंभीर प्रश्न उपस्थित करत कारखान्याचे संचालक मंडळ बरखास्त करून सक्षम प्रशासकाची नियुक्ती करावी, तसेच कारखान्याच्या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करावी, अशी मागणी शिर्डी संस्थानचे माजी विश्वस्त व कारखान्याचे सभासद प्रताप भोसले यांनी साखर आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.

भोसले यांनी पत्रात कारखान्याच्या आर्थिक स्थितीबरोबरच गाळपातील घट, कामगारांचे थकीत वेतन आणि ऊसतोडणी-वाहतूक खर्चातील कथित अनियमिततेचे मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, २०२३-२४ मध्ये कारखान्याने ६ लाख २४ हजार ५८६ मेट्रिक टन, २०२४-२५ मध्ये ४ लाख ४६ हजार ८७६ मेट्रिक टन, तर २०२५-२६ मध्ये केवळ ३ लाख ९६ हजार मेट्रिक टन ऊसाचे गाळप केले. कारखान्याच्या आर्थिक पत्रकानुसार सुमारे ४९ कोटी रुपयांचा तोटा असल्याचा दावा भोसले यांनी केला असून, प्रत्यक्ष तोटा अधिक असल्याचा आरोपही केला आहे. तसेच २०२०-२१ व २०२१-२२ मधील ऊसतोडणी-वाहतूक खर्चात सुमारे ७ कोटी २१ लाख रुपयांची अनियमितता झाल्याचा दावा पत्रात करण्यात आला आहे.

कामगारांचे वेतन अनेक महिन्यांपासून थकीत असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासक नेमावा तसेच कारखाना व संबंधित वाहतूक कंपनीच्या कारभाराची चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# तक्रारींचा पाऊस, कारवाईचा दुष्काळ !

## अहिल्यानगर जिल्हा प प्राथ. शिक्षण विभागाच्या कारभारावर गंभीर आरोप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात विविध तक्रारींची संख्या वाढत असताना चौकशी अहवाल मात्र कारवाईच्या फाईलमध्येच अडकून पडल्याचा गंभीर आरोप होत आहे. जामखेड, श्रीरामपूर, राहुरी आणि पारनेर तालुक्यांतून प्राप्त तक्रारींची गटशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करून अहवाल मागविण्यात आले आहेत. मात्र अहवाल प्राप्त झाल्यानंतरही संबंधित शिक्षक अथवा अधिकाऱ्यांवर ठोस कारवाई होत नसल्याने शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. काही तक्रारींमध्ये तथ्य आढळूनही संबंधितांना कारवाईपासून वाचविण्यासाठी तडजोडी केल्या जात असल्याचा आरोप तक्रारदारांकडून करण्यात येत आहे. काही शिक्षक संघटनांचे पदाधिकारी कारवाईच्या कचाट्यात सापडलेल्या शिक्षकांसाठी मध्यस्थी करीत असल्याचेही आरोप आहेत.

चौकट : चौकशी अहवाल कुठे अडकले?

विविध प्रकरणांच्या चौकशीसाठी गटशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकाऱ्यांमार्फत अहवाल मागविण्यात आले. काही अहवालांत दोष अथवा अनियमितता निदर्शनास आली असल्याचे सांगण्यात येते. तरीही पुढील कारवाई होत नसल्याने अहवाल नेमके कुठे अडकले, असा सवाल उपस्थित होत आहे. काही प्रकरणांत कठोर कारवाईऐवजी किरकोळ शिक्षा देण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही आहे.

**राहुरीतील प्रकरणाने उडवली खळबळ**

राहुरी तालुक्यातील एका तत्कालीन मुख्याध्यापिकेशी संबंधित प्रकरणाने या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. संबंधित प्रकरणाचा चौकशी अहवाल जिल्हा परिषद कार्यालयातून गायब झाल्याचा आरोप आहे. तसेच उंबरे येथील निर्लेखन प्रकरणात दोष आढळून शिक्षा झाल्यानंतरही संबंधित महिलेला केंद्रप्रमुख पदावरून विस्तार अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आल्याची बाब समोर आली होती. तक्रारीनंतर ही पदोन्नती रद्द करण्यात आली. मात्र अन्य आरोपांबाबत पुढील कारवाई का झाली नाही, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**'पैसा फेका, तमाशा पाहा' अशी अवस्था?**

शिक्षण विभागातील चौकशी, अहवाल व शिक्षेची प्रक्रिया आर्थिक व्यवहारांवर चालत असल्याचा गंभीर आरोप तक्रारदारांनी केला आहे. 'तक्रार करा, कारवाई होणार नाही' अशी मानसिकता निर्माण झाल्याचा आरोपही करण्यात येत आहे. या सर्व प्रकरणांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

**संघटना पदाधिकारी झालेत मध्यस्थ?**

शिक्षकांच्या प्रश्नांसाठी शिक्षक संघटनांनी लढा देणे अपेक्षित असताना काही पदाधिकारी अधिकाऱ्यांशी सलगी वाढवून चौकशीतील शिक्षकांवरील कारवाई थांबविण्यासाठी मध्यस्थी करीत असल्याचा आरोप आहे. त्यामुळे शिक्षण विभागातील निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, या आरोपांबाबत संबंधित शिक्षणाधिकारी व अधिकाऱ्यांची अधिकृत भूमिका समोर आलेली नाही. त्यांची बाजू उपलब्ध झाल्यास तीही प्रसिद्ध करण्यात येईल.

# आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांशी आमदार प्राजक्त तनपुरेंचा मनमोकळा संवाद



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** ; लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना समाजातील विविध घटकांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी काही लोकप्रतिनिधी प्रत्यक्ष जनतेत जाऊन संवाद साधतात. भाजपचे विधान परिषदेचे आमदार प्राजक्त तनपुरे यांनी राहुरी येथील श्री संत गाडगे महाराज प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेला अचानक भेट देत विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. आमदार तनपुरे यांनी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात जाऊन चक्क जमिनीवर बसत त्यांच्या अभ्यासाची, अडचणींची तसेच भविष्यातील स्वप्नांची आस्थेने विचारपूस केली. विद्यार्थ्यांच्या वहीत डोकावत त्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबतही त्यांनी चर्चा केली. त्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांच्या निवासाच्या खोल्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. बेडची व्यवस्था, स्वच्छता, पिण्याचे पाणी, भोजन तसेच अभ्यासासाठी उपलब्ध असलेले वातावरण याची त्यांनी माहिती घेतली. विद्यार्थ्यांना केवळ शिक्षणाची संधी मिळणे पुरेसे नसून त्यांना चांगल्या वातावरणात शिक्षण घेता यावे, यासाठी आवश्यक सुविधाही उपलब्ध असणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या छोट्या-छोट्या गरजा वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाहीकडे लक्ष देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, आमदार तनपुरे यांनी या भेटीबाबत सोशल मीडियावर केलेली पोस्ट तसेच विद्यार्थ्यांसोबतचे छायाचित्रे मोठ्या प्रमाणात चर्चेत आली आहेत.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## भद्रा मारुती मंदिरात श्रावणी शनिवारीनिमित्त भाविकांची गर्दी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद (रत्नपूर) येथील जागृत भद्रा मारुती मंदिरात श्रावण महिन्यातील दुसऱ्या शनिवारी लाखो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. 'पवनपुत्र हनुमान की जय', 'बजरंग बली की जय' आणि 'जय श्रीराम'च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. भद्रा मारुतीरायाला विविध रंगांच्या जरबेराच्या फुलांनी केलेली आकर्षक सजावट भाविकांचे विशेष आकर्षण ठरली. शनिवारच्या निमित्ताने पहाटे वेदमंत्रांच्या जयघोषात हनुमंतरायास अभिषेक व शास्त्रोक्त पूजन करण्यात आले. मध्यरात्री १२ वाजता शंखनाद व वेदमंत्रांच्या घोषात निद्रिस्त मूर्तीला अभिषेक करण्यात आला. त्यानंतर भाविकांसाठी दर्शन खुले करण्यात आले. भाविकांच्या सुविधेसाठी देवस्थानच्या वतीने आरोग्य सेवा, रुग्णवाहिका व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. पोलीस, होमगार्ड व पोलीस मित्र संघटनेच्या कार्यकर्त्यांनी दर्शन व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी सहकार्य केले. दिवसभरात सुमारे चार लाख भाविकांनी दर्शन घेतल्याची माहिती सुरक्षा अधिकारी राजेंद्र जोंधळे यांनी दिली.

## अमली पदार्थविरोधी जनजागृती सप्ताहाला उत्स्फूर्त प्रतिसाद; विद्यार्थ्यांची भव्य रॅली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वडाळा महादेव** : शिवा ट्रस्ट संचालित शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (नाशिक) व श्रीरामपूर शहर पोलिसांच्या संयुक्त विद्यमाने आर. बी. एन. बी. महाविद्यालयात अमली पदार्थ सेवन प्रतिबंध जनजागृती सप्ताह उत्साहात पार पडला. सप्ताहाच्या सांगता समारंभास महसूल मंत्री विखे प्रमुख उपस्थित होते. आठवडाभर रांगोळी, चित्रकला, घोषवाक्य, मेहंदी, पथनाट्य, वक्तृत्व व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. शहरातील विविध शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या दोन विद्यार्थिनींचा मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाट्यातून अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे आरोग्य व कौटुंबिक दुष्परिणाम प्रभावीपणे मांडत व्यसनांपासून दूर राहण्याचा संदेश देण्यात आला. पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी तरुणांनी व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमासाठी शिवा ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार, संचालक दिलीपदादा पवार, प्राचार्य डॉ. रिझवान अहमद व डॉ. बापूसाहेब हरिश्चंद्रे यांचे मार्गदर्शन लाभले.

## टाकळीभान येथे व्यसनमुक्ती अभियान



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : न्यू इंग्लिश स्कूल टाकळीभान या विद्यालयात दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय या ठिकाणावरून ब्रह्मकुमारी मंदादीदी ब्रह्मकुमारी छायादिदी व ब्रह्मकुमारी हेमलता दीदी त्याचबरोबर कोकाटे यांनी विद्यालयांमध्ये व्यसनमुक्ती अभियानांतर्गत सर्व विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ दिली. या प्रसंगी ब्रह्मकुमारी हेमलतादीदी यांनी विद्यार्थ्यांना व्यसनाधीनतेमुळे होणारे दुष्परिणाम समजावून सांगितले, तसेच ब्रह्मकुमारी मंदादीदी यांनी विद्यार्थ्यांना जन्मदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि आयुष्यात कधीच व्यसन करू नये असा संदेश दिला. त्याच बरोबर कोकाटे दादा यांनी ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय याची स्थापना आणि उद्देश याबद्दल माहिती दिली, तर ब्रह्मकुमारी छायादीदी ब्रह्मकुमारी मंदादीदी ब्रह्मकुमारी हेमलतादीदी व कोकाटे यांनी विद्यालयातील सर्वच विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ दिली. तसेच न्यू इंग्लिश स्कूल व अण्णासाहेब पटारे कनिष्ठ महाविद्यालय टाकळीभान या दोन्ही विद्यालयाला व्यसनमुक्तीची शपथ घेतल्याबद्दल प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

# संकरित प्रजननासाठी जातिवंत गाईला विक्रमी भाव

## तब्बल २ लाख ८१ हजारांना खरेदी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : शेतीला जोडधंदा म्हणून केला जाणारा दुग्ध व्यवसाय वाढत्या खर्चामुळे अडचणीत असल्याचे चित्र असताना, राहुरी तालुक्यातील ब्राह्मणगाव भांड येथील एका जातिवंत गाईला तब्बल २ लाख ८१ हजार रुपये विक्रमी भाव मिळाला आहे.माहेगाव येथील प्रवरा माई डेअरी फार्मचे संचालक आकाश आढाव यांनी संकरित गायींच्या प्रजनन व वंशसुधारणेसाठी ही गाय खरेदी केली. किरण वारुळे यांनी योग्य संगोपन, संतुलित आहार, नियमित आरोग्य तपासणी आणि स्वच्छतेची विशेष काळजी घेतलेल्या या गाईची विक्री केली. १०० टक्के होस्टेन फ्रिजीयन (क्क्र) जातीची, काळी-बांडी असलेली आणि दररोज सुमारे ४० लिटर दूध देण्याची क्षमता असलेली ही गाय असल्याचे सांगण्यात आले. गाईच्या विक्रीची माहिती समजताच माहेगावातील ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली. गाईची विधिवत पूजा करून तिला फुलांचा हार घालण्यात आला.



त्यानंतर गुलालाची उधळण, डीजेच्या तालावर जल्लोष आणि फटाक्यांची आतषबाजी करत गावातून गाईची वाजतगाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली. चांगल्या कालवडींचे उत्पादन वाढवून अधिक जातिवंत आणि उच्च दूध उत्पादन क्षमता असलेल्या कालवडी तयार करण्याच्या उद्देशाने या गाईची खरेदी करण्यात आल्याचे आकाश आढाव यांनी सांगितले. या व्यवहारामुळे दुग्ध व्यवसायात चांगल्या आनुवंशिक गुणधर्म असलेल्या जातवंत गायींचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

## नव्या शैक्षणिक पद्धतींसाठी शिक्षकांचे प्रभावी प्रशिक्षण

### शिर्डीत विशेष कार्यशाळा संपन्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल, शिर्डी येथे शिक्षकांसाठी आधुनिक व विद्यार्थी-केंद्रित अध्यापन पद्धतींवर आधारित विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेस जिल्हा समन्वयक (रतलाम, मध्य प्रदेश) तथा साई श्री इंटरनॅशनल अकॅडमीच्या प्राचार्या डॉ. श्वेता विंचूरकर यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत एनईपी २०२०, एनसीएफ २०२३, कॉम्पिटन्सी-बेस्ड, एक्सपिरियन्शियल व ॲक्टिव्हिटी-बेस्ड लर्निंग, फॉर्मेटिव्ह असेसमेंट तसेच २१ व्या शतकातील कौशल्ये यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. केजी ते माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना विद्यार्थ्यांचा वर्गातील सहभाग वाढविणे, कृतीआधारित शिक्षण, भावनिक व सामाजिक विकास आणि शिक्षकाची लर्निंग फॅसिलिटेटर म्हणून भूमिका याविषयी प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात आले.

विशेषतः केजी शिक्षकांसाठी ईसीसीई, पंचकोश विकास, फाउंडेशनल लिटरेसी व न्युमरसी, प्ले-बेस्ड लर्निंग आणि आयडू -वूईडू - यूडू या अध्यापन तंत्रांचा वर्गात प्रभावी वापर कसा करावा, हे समजावून सांगण्यात आले. ही कार्यशाळा श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.

# दै. राष्ट्र सह्याद्रीच्या बातमीचा इम्पॅक्ट

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यावर मदत जमा होण्यास सुरुवात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ममदापूर** : मार्च २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून मंजूर करण्यात आलेली नुकसानभरपाई अखेर त्यांच्या बँक खात्यावर जमा होण्यास सुरुवात झाली आहे. दै. राष्ट्र सह्याद्रीने दि. १५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केलेल्या वृत्ताची प्रशासनाने दखल घेतल्यानंतर मदत वितरणाची प्रक्रिया सुरू झाल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मार्च महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे ममदापूर परिसरातील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.


दैनिक राष्ट्र सह्याद्री
E-pepar - 15 Aug 2026 - Page 4

केवायसी करूनही ममदापुरचे शेतकरी मदतीपासून वंचित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

ममदापूर : मार्च मध्ये अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाकडून निधी मंजूर करण्यात आला. संबंधित शेतकऱ्यांनी आवश्यक केवायसी प्रक्रियाही पूर्ण केली, मात्र अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्याप मदतीची रक्कम जमा झालेली नसल्याची तक्रार समोर येत आहे. अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाल्यानंतर शासनाकडून मदत मिळण्याची अपेक्षा असलेल्या शेतकऱ्यांना आता निधीसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. निधी मंजूर होऊनही आणि केवायसी पूर्ण करूनही पैसे खात्यावर जमा होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. शेतकऱ्यांच्या खात्यावर मदत नेमकी कोणत्या कारणामुळे जमा झालेली नाही, याबाबत प्रशासनाने स्पष्ट माहिती द्यावी, तसेच प्रलंबित प्रकरणांची तातडीने तपासणी करून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर नुकसानभरपाईची रक्कम जमा करावी, अशी मागणी होत आहे. राहाता तालुक्यातील वंचित शेतकऱ्यांना अतिवृष्टी मदत कधी मिळणार? असा सवाल आता शेतकरी उपस्थित करत आहेत.

शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी निधी मंजूर केला होता. संबंधित शेतकऱ्यांनी आवश्यक केवायसी प्रक्रिया पूर्ण करूनही अनेकांच्या खात्यावर नुकसानभरपाईची रक्कम जमा झालेली नव्हती. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण होते. याबाबत दैनिक राष्ट्र सह्याद्रीने 'निधी मंजूर, घधउ पूर्ण; तरीही मदत खात्यावर कधी?' या मथळ्याखाली दि. १५ ऑगस्ट रोजी सविस्तर वृत्त प्रसिद्ध करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. वृत्ताची दखल घेतल्यानंतर आता पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर नुकसानभरपाई जमा होण्यास सुरुवात झाली आहे.

दरम्यान, अद्यापही काही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित असल्याने त्यांच्या प्रकरणांची तातडीने तपासणी करून प्रलंबित रक्कम खात्यावर जमा करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. दैनिक राष्ट्र सह्याद्रीच्या वृत्तानंतर सुरू झालेली मदत वितरण प्रक्रिया हा शेतकऱ्यांच्या प्रश्नाला मिळालेला सकारात्मक प्रतिसाद मानला जात आहे.

## म्हैसगावात बिबट्याचा मुक्त संचार बंदोबस्त करा : विलास गागरे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : तालुक्यातील म्हैसगाव येथे गेल्या काही दिवसांपासून एका बिबट्याचा मुक्त संचार दिसत आहे. यामुळे म्हैसगाव परिसरात नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले असून सदर बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी विलास गागरे यांनी केली. राहुरी तालुक्यातील म्हैसगाव येथे विलास गागरे यांचे बंधु पांडुरंग गागरे यांचे घर आहे. घराला ७ ते ८ फूट उंचीचे कुंपण आहे. दि. २० ऑगस्ट २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास एक बिबट्याने कुंपणावरुन उडी मारून आत प्रवेश केला. आणि कुत्र्याच्या मागे धावला. त्यावेळी कुत्र्याने मोठ्याने भुंकने सुरु केले. कुत्र्याचा ओरडण्याचा आवाज ऐकून पांडुरंग गागरे यांनी घराचा दरवाजा उघडला असता सदर बिबट्याने पून्हा कुंपणावरुन उडी मारून धुम ठोकली. सदर प्रकार हा सीसीटिव्ही कॅमेर्यात कैद झाला आहे. या घटनेमुळे म्हैसगाव परिसरात परिसरात नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. महिला पुरुष शेतात काम करण्यास जात नाही. शाळेतील मुले शाळेत जाण्यासाठी घाबरत आहे. कोणतीही दुदैवी घटना घडण्या अगोदर वन विभागाने सदर बिबट्याला पकडण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच म्हैसगाव परिसरात पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे. अशी मागणी विलास गागरे व म्हैसगाव ग्रामस्थांकडून होत आहे.

# नॅनो डीएपी तंत्रज्ञानावरील शेतकरी संवादाला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नेवासा फाटा येथील रेणुका माता सभागृहात कोरोमंडल इंटरनॅशनल लिमिटेडच्या वतीने शेतकऱ्यांसाठी नॅनो डीएपी उच्च तंत्रज्ञानाविषयी आयोजित चर्चा व संवाद कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे माजी सभापती रावसाहेब कांगुणे पाटील होते. या चर्चासत्रात शेतकऱ्यांनी विविध प्रश्न उपस्थित करून उत्स्फूर्त सहभाग घेतल्याने कार्यक्रमाला चांगली रंगत आली. विभागीय कृषी विद्यापीठाचे डॉ. विनेश रेगे, माजी कुलगुरू डॉ. अशोकराव ढगे तसेच कृषी विज्ञान केंद्र, दहिगावचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. शामसुंदर कौशिक यांनी मार्गदर्शन केले. डॉ. अशोकराव ढगे यांनी नॅनो तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या डीएपी खताचा वापर करण्याचे आवाहन केले. उच्च तंत्रज्ञानाचा वापर ही शेती क्षेत्राची काळाची गरज असून, त्यातून खतांच्या खर्चात बचत होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

डॉ. रेगे यांनी नॅनो डीएपी हे द्रवरूप खत असून फवारणीद्वारे त्याचा वापर करता येतो. नॅनो कण अतिसूक्ष्म असल्याने पिकांकडून त्याचे शोषण कार्यक्षम पद्धतीने होते व खताचा अपव्यय कमी होतो, असे स्पष्ट केले.

डॉ. कौशिक यांनी पिकांची अवस्था लक्षात घेऊन खतांचा संतुलित वापर करण्याचे आवाहन केले. माजी सभापती रावसाहेब कांगुणे यांनी नॅनो डीएपीचा शेतावर चांगला परिणाम दिसून आल्याचे सांगितले. प्रश्न विचारणाऱ्या शेतकऱ्यांना बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन कृषी विद्यावेत्ता प्रणव जाधव यांनी केले.

## योगीराज गंगागिरी महाराज सप्ताहस्थळी श्रीरामपूर नगरपरिषदेचे स्वच्छता अभियान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : श्रीक्षेत्र धनगरवाडी येथे सुरू असलेल्या योगीराज गंगागिरी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर श्रीरामपूर नगरपरिषदेच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सप्ताहासाठी मोठ्या संख्येने भाविक दाखल होत असल्याने परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवण्यासाठी नगरपरिषदेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी श्रमदान केले. नगराध्यक्ष करण ससाणे, उपनगराध्यक्ष कांचन सानप तसेच सर्व नगरसेवक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांच्या नेतृत्वाखाली हे अभियान राबविण्यात आले. नगरपालिकेचे १०० हून अधिक अधिकारी-कर्मचारी तसेच कंत्राटी कर्मचारी आणि महिला कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत सप्ताहस्थळ, परिसरातील रस्ते व भाविकांच्या वर्दळीची ठिकाणे स्वच्छ केली. यावेळी मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांच्यासह रावसाहेब घायवट, संजय आरणे, दीपक मारशिया, घटकांबळे, अरुण तुपे, गोरख दौंडे, अशोक वाघ, वैभव चव्हाण, गणेश गवळी, अमोल गायकवाड, ज्ञानेश्वर चव्हाण, ज्ञानेश्वर गायकवाड, संजय प्रधान, संतोष पंडागळे, दादा छल्लारे, दत्तू चव्हाण, अभिजीत कांबळे, जयकृष्ण अहिरे, सचिन जेधे, ईश्वर शेळके, अजय गायकवाड, रहीमखा सय्यद यांच्यासह अनेक कर्मचाऱ्यांनी श्रमदान केले. महिला कर्मचाऱ्यांमध्ये वंदना पाटील, मंगल रेड्डी, कांचन चावरिया, रासकर, क्षत्रिय, स्वाती निरगुडे व देशमुख मॅडम यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनीही सहभाग घेतला. नगरपरिषदेच्या या उपक्रमामुळे सप्ताहस्थळाचा परिसर स्वच्छ ठेवण्यास मोठी मदत झाली.

# प्रतापपुर येथे वानराचा विधिवत दफनविधी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील प्रतापपूर गावात गेल्या अनेक दिवसांपासून मुक्कामी असलेल्या आणि लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांचा लाडका बनलेल्या वानराचे शनिवारी (दि. २२) सकाळी अचानक निधन झाले. या वानराशी निर्माण झालेल्या घट्ट भावनिक नात्यामुळे ग्रामस्थांनी त्याला 'हनुमान स्वरूप' मानून विधिवत धार्मिक पध्दतीने दफनविधी करत निरोप दिला.

प्रतापपूर - आश्वी या दोन्ही गावात गेल्या काही दिवसांपासून या वानराचे वास्तव्य आणि ये-जा सुरू होती. हे वानर अत्यंत शांत व उपद्रवमुक्त स्वभावाचे होते. त्याने कधीही कोणालाही त्रास दिला नाही किंवा कोणाचेही आर्थिक अथवा भौतिक नुकसान केले नाही. गावातील नागरिक दररोज त्याला फळे व इतर खाद्यपदार्थ




प्रेमाने खाण्यासाठी देत असत. लहान मुलांसाठी तर हे वानर पाहणे ही रोजची पर्वणीच बनली होती. त्यामुळे संपूर्ण गावात या वानराविषयी आपुलकी व लळा निर्माण झाला होता.

दरम्यान, शनिवारी सकाळी हे वानर गावात मृतावस्थेत आढळून आले. ही बातमी वाऱ्यासारखी पसरताच ग्रामस्थांनी हळहळ व्यक्त केली. यानंतर ग्रामस्थांनी या वानरांचा विधिवत दफनविधी केला आहे.

# अहिल्यानगरची जलसंजीवनी मुळा धरण भरले ९६ टक्क्यांपर्यंत

राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : जुलै महिन्यातील समाधानकारक पावसानंतर ऑगस्ट महिन्यातही मुळा धरणाच्या लाभक्षेत्रात बऱ्यापैकी पावसाने हजेरी लावल्याने मुळा धरणाचा जलसाठा २४,९५५ टीएमसी इतका समाधानकारक पाणीसाठा झाल्यामुळे महिला नगर जिल्ह्यात शेतकऱ्यांसह नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे. अहिल्यानगर जिल्ह्याला वरदान ठरलेले मुळा धरण ९६ टक्क्यांच्या पुढे भरल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतीची व नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बऱ्यापैकी सुटला असून सर्वत्र समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



सुरुवातीला पावसाने दडी मारल्यामुळे यापूर्वी धरणाची पातळी अतिशय खालावली होती. त्यामुळे राहुरी शहरालाही पिण्याच्या पाण्याची मोठी अडचण निर्माण झाली होती. परंतु, आता धरण जवळपास भरण्याच्या मार्गावर असल्याने बळीराजा सुखावला आहे. जुलै महिन्यात मुळा धरणाच्या लाभक्षेत्रात पावसाने उत्तम हजेरी लावल्याने मोठ्या प्रमाणात आवक धरणामध्ये झाली होती. सध्या धरणाचा साठा २४,९४४ एमसीएफटी झाला असून सुमारे ९६% झाला आहे.

मुळा धरणाचा साठा सुमारे ९६ टक्के झाल्याने आता धरणाचे दरवाजे उघडण्याची प्रतीक्षा शेतकरी व नागरिक करीतआहेत. धरणातून कालव्यांना पाणी सोडण्यासाठी आमदार अक्षय कर्डिले यांनी विशेष प्रयत्न केले. त्यामुळे मुळा उजव्या व डाव्या कालव्यासाठी कालपासून पाणी सोडण्यात आले आहे. तसेच मुळा धरणात कोतुळकडून ८८६ क्युसेस वेगाने पाण्याची आवक सुरू आहे. लाभक्षेत्रात पावसाचे प्रमाण व पाण्याची आवक अशीच सुरू असल्याने धरण लवकरच पूर्ण क्षमतेने भरू शकते. धरणाची पातळी वाढल्यानंतर मुळा नदीतही पाण्याचा विसर्ग सोडला जाण्याची शक्यता आहे. मुळा पाटबंधारे विभाग व जलसंपदा विभागाचे अधिकारी धरणाच्या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. पूर्ण भरण्यात आल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

## अजानबाहू भक्त प्रल्हादगिरी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त धार्मिक सोहळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : नेवासा तालुक्यातील सुरेशनगर-हंडीनिमगावच्या मध्यावर असलेल्या स्वयंभू त्रिवेणीश्वर महादेव देवस्थान येथे प.पू. ब्रह्मलीन अजानबाहू भक्त योगिराज प्रल्हादगिरीजी महाराज यांच्या २८व्या पुण्यतिथीनिमित्त त्रिदिनात्मक धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार दि. २६ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता राष्ट्रसंत गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज यांच्या हस्ते धर्मध्वजपूजन व गोमाता प्रतिष्ठापना करण्यात येणार असल्याची माहिती देवस्थानचे प्रमुख महंत रमेशानंदगिरी महाराज यांनी दिली. या सोहळ्यास देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज, वेदांताचार्य ह.भ.प. देविदास महाराज म्हस्के शास्त्री, महंत उद्धवजी महाराज मंडलिक, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, खा. भाऊसाहेब वाकचौरे, आ. विठ्ठलराव लंघे, माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्यासह संत-महंत व मान्यवर उपस्थित राहणार आहेत. गुरुवार दि. २७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ ते ९ वाजता तेजस्विनी नवले यांचे प्रवचन होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार दि. २८ ऑगस्ट रोजी पुण्यतिथीनिमित्त सकाळी ६ ते ९ या वेळेत जलाभिषेक, महाआरती व समाधीपूजन होईल. दुपारी ३ ते ५ या वेळेत ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांचे कीर्तन होणार आहे. पंचक्रोशीतील भाविकांनी या धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महंत रमेशानंदगिरीजी महाराज यांनी केले आहे.


## व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँक लि;बीड

मुख्य कार्यालय - जालना रोड , बीड-४३११२२.
फोन न .०२४४२-२३०२९३
शाखा - श्रीरामपूर फोन नं.(०२४२२) २२५३३३

### जाहीर हरकतीस / खुलाश्यास उत्तर

तमाम जनतेस विशेषतः कर्जदार मे.सुपर्ब ऑटो बॅटरिज प्रो.शेख मोहम्मद हुसैन मम्मू यांनी घेतलेल्या दि.१३/०८/२०२६ रोजीच्या दैनिक राष्ट्र सह्याद्री या वृत्तपत्राच्या जाहीर हरकतीस उत्तर / खुलासा देण्यात येतो कि, कर्जदार मे. सुपर्ब ऑटो बॅटरिज प्रो.श्री.शेख मोहम्मद हुसैन मम्मू यांनी द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँक लि.,बीड - शाखा श्रीरामपूर येथून दिनांक २७/०२/२००१ रोजी नजरगहाण कर्ज रक्कम रु.१०,००,०००/- (अक्षरी रु.दहा लाख मात्र) घेतलेले आहे. सदर कर्ज थकीत झाल्यामुळे बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ नुसार कार्यवाही केली व त्यानुसार दि.०६/०९/२००३ रोजी बँकेस कलम १०१ नुसार वसुली दाखला क्र.१०९/२००३ प्राप्त झालेला आहे. प्राप्त वसुली दाखल्यानुसार बँकेने कायदेशीर कारवाई करून बँकेने कर्जदार यांना थकीत रकमेची वेळोवेळी मागणी केलेली आहे.नोटीस देऊनही कर्जदार यांनी थकीत कर्ज रक्कम भरणा केली नाही.त्यामुळे दि.२४/०७/२०१९ रोजीच्या जप्ती बोजा आदेशानुसार मौजे दत्तनगर येथील गट क्र.१९/ब/२४/१० क्षेत्र ००.०५.२० चौ. मी. कर्जदार यांच्या तारण असलेल्या व दिनांक १९/०७/२०२४ रोजीच्या जप्ती बोजा आदेशानुसार बांधकाम मिळकत क्र. ७११ क्षेत्र १८०० चौ. फु. १६७.२३ चौ.मी. खुली जमीन ३७९५ चौ.फु.३५२.५७ चौ.मी. व मिळकत क्र.७२१ क्षेत्रफळ २७९८ चौ.फूट (२५९.९१ चौ.मी.) तारण नसलेल्या मालमत्तेवर बँकेने जप्ती बोजा नोंदविलेला आहे.

उपरोक्त मालमत्तेचे मे.जिल्हा उपनिबंधक साहेब , सहकारी संस्था ,अहिल्यानगर यांचे कडून वाजवी मुल्यांकन(अपसेट प्राईस) प्रकरणास मान्यता मिळालेली आहे.सदर मुल्यांकन मंजुरीसाठी मे.जिल्हा उपनिबंधक साहेब , सहकारी संस्था ,अहिल्यानगर यांच्या कार्यालयात दि.२१/११/२०२५ रोजी बँकेने प्रस्ताव दाखल केला होता. सदरील दाव्यामध्ये सुनावणी होऊन दि.१५/१२/२०२५,२४/१२/२०२५,०५/०१/२०२६,व १४/०१/२०२६ या तारखेला कर्जदार यांना रीतसर सुनावणी नोटीस पाठवून सुनावणीस हजर राहणे बाबत कळविले होते.व सदर प्रकरणाची सुनावणी करिता कर्जदार स्वत: हजर होते .सुनावणी दरम्यान कर्जदार यांनी स्वत: मालमत्तेचे मुल्यांकन सादर केले आहे. त्यामुळे त्यांना आक्षेप घेण्यासाठी पुरेसा वाव मे.जिल्हा उपनिबंधक साहेब , सहकारी संस्था ,अहिल्यानगर यांनी दिला होता त्या दरम्यान (सुनावणीच्या वेळी) कर्जदार यांनी हरकत घेतलेली नाही. त्यामुळे जाहीर लिलाव जाहिरातीत नमूद केलेली मिळकत क्र.७२१ क्षेत्रफळ २७९८ चौ.फूट (२५९.९१ चौ.मी.) या मालमत्तेबाबत कर्जदार यांना कोणताही आक्षेप घेण्याचा कायदेशीर हक्क/ अधिकार आज रोजी राहिलेला नाही .सदरची लिलाव प्रक्रिया हि मे.जिल्हा उपनिबंधक साहेब , सहकारी संस्था ,अहिल्यानगर यांचे दि.१२/०५/२०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार पूर्णपणे कायदेशीर आहे.सबब बँकेने चालू केलेली लिलाव प्रक्रियेस कर्जदार यांनी दिलेल्या हरकती बाबतचा मजकूर हा दिशाभूल करणारा व निराधार असून कायदेशीर प्रकीयेमध्ये अडथळा निर्माण करणारा चुकीचा व बेकायदेशीर आहे. तो बँकेस मान्य व कबुल नाही. त्यामुळे कर्जदार यांनी नोंदविलेला आक्षेप / हरकत व्यर्थ आहे.

तरी कर्जदार यांनी बँकेची थकीत कर्ज बाकी रु.३,६३,५९,५०८.२८ भरून कर्ज खाते बेबाक करावे. व जाहीर लिलावाव्दारे होणारी प्रक्रिया टाळावी. अन्यथा सदरील प्रकिया कायदेशीररीत्या पूर्ण केली जाईल व होणाऱ्या सामाजिक,आर्थिक , मानसिक नुकसानीस आपण स्वत: सर्वस्वी जबाबदार राहाल. याची नोंद घ्यावी.

दि.२२/०८/२०२६

वसुली अधिकारी
द्वारकादास मंत्री नागरी
सहकरी बँक लि.,बीड
शाखा श्रीरामपूर

## द•ख•ल



### दहेश्वर विद्यालयात आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा संपन्न

**अमरापुर :** श्री मारुतरावजी घुले पा शिक्षण संस्थेचे दहेश्वर माध्यमिक विद्यालय दहिफळ जूने ता शेवगाव आज विद्यालयात पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे विधी महाविद्यालय हडपसर पूणे व अक्षर मानव संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक इंगावले सर होते या कार्य शाळेमध्ये आग लागल्यास आग कशी विझवावी, अपघातग्रस्तांना प्रथमोपचार कसा द्यावा, सर्पदंश झाल्यास योग्य प्रथमोपचार, पूर येण्यापूर्वी व पूर आल्यानंतर घ्यावयाची खबरदारी, भूकंप, आग, इमारत कोसळणे तसेच नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीच्या वेळी स्वत:चे व इतरांचे संरक्षण कसे करावे या बाबत मार्गदर्शन व प्रात्यक्षिके घेण्यात आली. या कार्यक्रमात राजेंद्र घाडगे, सुनेत्रा पवार, संदीप कदम, मोहनराव देशमुख, एल. पवार यांनी आपत्ती व्यवस्थापनाची स्वतः हा माहिती सांगून प्रात्यक्षिक करून दाखवली या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक इंगावले सरांनी मनोगतात सागितले की, आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचा निश्चित विद्यालयातील विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन मिळाले याचा उपयोग ते स्वत: हा व इतरांचे संरक्षण करण्यासाठी उपयोग करतील. या सर्व सहभागी विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार करुन त्यांच्या या कार्यास शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी विकास राऊत, अंबादास नन्नावरे, प्रमिला बोडखे, यशोदास वाघमारे, रणजित जाधव, विकास व्यवहारे, विशाल जोशी, देविदास आरगळे, गोरख लिंभोरे आणि विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार वाघमारे सरांनी व्यक्त केली.

### रेसिडेन्शिअल हायस्कूलम विद्यार्थ्यांनी सर्पमित्रांकडून घेतली सापांची माहिती

**शेवगाव :** सापाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. साप हा केवळ मानवमित्र नसून तो निसर्गमित्रही आहे. सापाचे मुख्य अन्न उंदीर आहे. याशिवाय पिकांवरील कीटक, डासांच्या अळ्या, घुशी यांवर साप नियंत्रण ठेवतो. एक धामण वर्षात शेकडो उंदीर खाऊन सापाचे



नियंत्रण ठेवतो. एक धामण वर्षात शेकडो उंदीर खाऊन पिकांचे नुकसान टाळते. सापाचे उंदीर पकडण्याचे तंत्र परिणामकारक आहे. विद्यालयातील विद्यार्थ्यांना सर्पांची माहिती व्हावी, यासाठी सर्पमित्र सुशांत मनवरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. रेसिडेन्शिअल हायस्कूलमध्ये मधील विद्यार्थ्यांना सर्पमित्रांकडून सापांची माहिती व्हावी यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी सर्पविषयीची माहिती जाणून घेतली. या व्याख्यानाचे आयोजन रेसिडेन्शिअल हायस्कूलमधील राष्ट्रीय हरित विभाग सेना प्रमुख सचिन दहिफळे यांच्या संकल्पनेतून व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. सर्पमित्र सुशांत मनवरे गेल्या बारा वर्षांपासून सर्व जनजागृती तसेच सर्वांना सुरक्षित रित्या पकडून निसर्गात सोडण्याचे काम करत आले आहेत. यावेळी प्राचार्य बालाजी गायकवाड, उपमुख्याध्यापक अविनाश रामफळे, पर्यवेक्षक महेश शिंदे तसेच विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक चंद्रकांत अमृते सर्व विद्यार्थी उपस्थित होते. या व्याख्यानाचे प्रास्ताविक सचिन दहिफळे यांनी केले. सूत्रसंचालन बाळासाहेब गव्हाळ यांनी केले तर आभार रामनाथ काळे यांनी मानले.

### ग्रामीण विकासात सेंट्रल बँकेचा मोठा वाटा : आंधळे



**अहिल्यानगर :** सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही सर्वसामान्य ग्राहकांच्या हक्काची पसंतीची स्वदेशी बँकआहे .शेतकरी, शेतीपूरक उद्योग उद्योजक ,लघुउद्योजक ,शिक्षणासाठी उच्च स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यापासून सर्वसामान्य नागरिकांचे घरापासून ते गाड्यापर्यंतचे स्वप्न साकार करणारी सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही सर्वसामान्यांच्या हक्काची बँक आहे . ग्राहकांना उत्कृष्ट आणि सुलभ आर्थिक उत्पादनांची सेवा देण्याच्या उद्देशाने सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे वेळोवेळी ग्राहकांच्या सेवेसाठी कॅम्पचे आयोजन केले जाते.सेंट्रल बँक शेतकरी, गोरगरीब आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी ग्रामीण भागात खऱ्या अर्थाने काम करत आहे. ग्रामीण विकासात सेंट्रल बँकेचा मोठा वाटा असल्याचे प्रतिपादन अहिल्यानगर क्रीडाईचे उपाध्यक्ष प्रसाद आंधळे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक नरेशकुमार दुबे होते.याप्रसंगी उद्योजक गोविंद वाघ,सामाजिक वनीकरणाचे अमोल जाधव,विखेपाटील कॉलेज आयटी विभागाचे एच ओ डी दीपक विधाते,विखे .पा. कृषी महाविद्यालयाचे प्रा. डॉ, सोमेश्वर राऊत, मुख्य प्रबंधक संजय कराड, संदीप काळे, प्रशांत जाणघेल आदींसह सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे ग्राहक बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त मंगळवारी धार्मिक कार्यक्रम

**अहिल्यानगर :** स्वकुळसाळी समाजाचे आद्यदैवत वेदमूर्ती भगवान श्री जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव श्री जिव्हेश्वर भक्तसेवा मंडळ, सावेडी यांच्यावतीने मंगळवार, दि. २५ ऑगस्ट रोजी गावडे मळा, पाईपलाईन रोड, सावेडी येथे विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. जन्मोत्सवानिमित्त सकाळी ६ वाजता सुभाष पाठक व विठ्ठल बागडे यांच्या हस्ते भगवान श्री जिव्हेश्वर ग्रंथाचे वाचन होईल. त्यानंतर सौ. रमा झिकरे व श्री. ओमप्रकाश झिकरे यांच्या हस्ते पादुका अभिषेक संपन्न होणार आहे. भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव, गीतपाळणा व इतर धार्मिक विधी श्री जिव्हेश्वर भक्तसेवा मंडळाच्या महिला विभागाच्यावतीने पार पडतील. पालखी पूजनानंतर भगवान श्री जिव्हेश्वरांची भव्य शोभायात्रा सावेडी परिसरातून काढण्यात येणार असून, बालगोपाळांच्या लेझीम पथकाचा सहभाग हे मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरणार आहे. त्यानंतर महिला विभाग व भजनी मंडळाच्यावतीने श्री जिव्हेश्वर भजनामृत व नामस्मरणाचा कार्यक्रम होणार असून, उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात येईल. श्रावण शुद्ध त्रयोदशीला भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव साजरा करण्याची परंपरा स्वकुळसाळी समाजात अनेक वर्षांपासून जपली जात आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात ७५०० रक्तपिशव्यांचा संकल्प

## मोबाईलमुळे जसे माणसे जोडली तसे रक्तदानातून माणुसकीचे नाते : ना. विखे पाटील

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, या माध्यमातून अनेक रुग्णांचे प्राण वाचवण्याचे काम होत असते. रक्तदान करणाऱ्यांमध्ये समाजात असलेले गैरसमज या मेगा रक्तदान शिबिरातून दूर होण्याचे काम होईल. अहिल्यानगर मोबाईल रिटेलर्स असोसिएशनने मोबाईलमुळे जसे माणसे जोडण्याचे काम केले, तसे रक्तदानातून माणुसकीचे नाते निर्माण केले. नंदनवन मंगल कार्यालय येथे आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये युवकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून येत असून, महिलाही पुढे येऊन मोठ्या प्रमाणात रक्तदान करताना दिसत आहेत. ही राज्यातील पहिली घटना असेल. रक्तदात्यांचे व रक्तपेढींचे अभिनंदन करतो की, या



माध्यमातून अनेक रुग्णांचे जीव वाचले जातील. आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकीचे दर्शन पाहायला मिळाले असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

अहिल्यानगर मोबाईल रिटेलर्स असोसिएशन व काका ट्रस्ट यांच्यावतीने मेगा रक्तदान शिबिराचे उद्घाटन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका, उपमहापौर डव्होकेट धनंजय जाधव, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी उपमहापौर गणेश भोसले, अनिल बोरुडे, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, विनायक देशमुख, स्थायी समितीचे सभापती पहलवान सुभाष लोंढे, माजी सभापती कुमारसिंह वाकळे, अविनाश घुले, मोबाईल रिटेलर्स असोसिएशनचे अध्यक्ष अजित जगताप, नगरसेवक विकी जगताप, गोरख पडोळे, अजित पवार, अमित बुरा, मर्चंट बँकेचे चेअरमन संजय चोपडा, मनपा महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, प्राध्यापक माणिक विधाते, नगरसेवक महेश तवले, सुनील त्रिंबके, प्रकाश भाग नगरे, आशिष पोखरणा, मनीष चोपडा, सुरेश बनसोडे, मयूर बांगरे, दत्ता गाडळकर, अजिंक्य बोरकर, विपुल शेट्टी, बाळासाहेब बारस्कर, योगेश ठुबे, डॉक्टर सागर बुरुडे, महेश लोंढे, डॉक्टर आशिष भंडारी, राज देशमुख, नगरसेविका सुजाता पडोळे, सोनाबाई शिंदे, सुनीता हुलसंदर, गीतांजली काळे, शितल ढोणे, अनिता शेटीया, मयुरी जाधव आदींसह रक्तदाते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. संग्राम जगताप म्हणाले की, मोबाईल रिटेलर्स असोसिएशनची २०१६ साली स्थापना झाली. उद्योग-व्यवसायापुरते मर्यादित न राहता समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो.

## साखरेच्या वाढीव दराचा ऊस उत्पादकांना मोबदला द्या

### शेवगावच्या शेतकरी संघटनेची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** मागील गळीत हंगामातील तयार झालेल्या साखरेच्या भाववाढीचा फायदा अहिल्यानगर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळावा यासाठी प्रति टन ५०० रुपये वाढीव मोबदला देण्यात यावा, अशी मागणी शेवगाव तालुक्या तील शेतकरी संघटनेने केली आहे. याबाबत शेतकरी संघटनेचे अध्यक्ष ताराचंद कोंडिबा लोंढे यांनी अहिल्यानगर येथील साखर सह संचालकांकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, ज्ञानेश्वरनगर तसेच गंगामाई शुगर इंडस्ट्रीज, हरिनगर वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना कासार पिंपळगाव यांच्यासह जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक बांधवांना वाढीव दरातील फरकाचा मोबदला द्यावा.

मागील गळीत हंगामातील शिल्लक साखर साठ्याच्या दरात झालेल्या वाढीचा योग्य मोबदला ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक असल्याचे संघटनेने म्हटले आहे. याशिवाय अनेक साखर कारखान्यांकडे डिस्टिलरी, को-जनरेशन, मळी, खते तसेच इतर उपउत्पादनांचे प्रकल्प आहेत. या माध्यमातून कारखान्यांना मिळणाऱ्या अतिरिक्त उत्पन्नाचा योग्य वाटा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळावा, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

**‘शेतकऱ्यांना न्याय न मिळाल्यास आंदोलन’**

वाढीव दराचा मोबदला सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देण्याची मागणी मान्य करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अन्यथा सर्व शेतकरी बांधवांना सोबत घेऊन रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही शेतकरी संघटनेने प्रशासनाला दिला आहे.

या मागणीची दखल घेऊन प्रशासन आणि संबंधित साखर कारखाना व्यवस्थापन शेतकऱ्यांच्या मागणीबाबत काय भूमिका घेते, याकडे आता ऊस उत्पादकांचे लक्ष लागले आहे.

निवेदनाच्या प्रती: साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य पुणे; तहसीलदार शेवगाव आणि जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांना देण्यात आल्या आहेत.

## श्रद्धेला विकासाची जोड देऊन मंदिर परिसर सुशोभित : आ. दाते

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील पोखरी व पवळदरा परिसरातील विविध विकासकामांचा शुभारंभ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते नारळ वाढवून करण्यात आला. स्व. गं. भा. कोसाबाई व कै. तुळशीराम मामा शेलार यांच्या स्मरणार्थ मा. परशुराम शेलार मामा, माजी उपसरपंच यांनी स्वखर्चातून ५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून पोखरी येथील विकासकामांना हातभार लावला आहे. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले. या निधीतून पवळदरा येथील बंदिस्त गणपती मंदिराकडे जाणारा रस्ता करणे तसेच येडूबाई माता मंदिराचे सुशोभीकरण करणे या कामांना प्रारंभ करण्यात आला. यावेळी बोलताना आ. काशिनाथ दाते पोखरी-पवळदरा परिसरातील नागरिकांच्या विविध मागण्या आणि विकासाच्या प्रश्नांची दखल घेत, ही कामे येत्या काळात पूर्णत्वास नेण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगितले.



कार्यक्रमास परशुराम शेलार, अशोक खैरे, यादव फरतारे, कुंडलिक वाकळे, अण्णा पवार, बाबुराव आहेर, सोपान फरतरे, महादु पवार, बन्सी करंजेकर, गोविंद पवार, म्हताजी करंजेकर, निलेश पवार, बाळशीराम शिंदे, युवा सहकारी शिवम पवार, डॉ. अविनाश शेलार, चंद्रकांत राजभोज, विनायक शिंदे, विठ्ठल फरतरे, साहेबराव फरतरे, योगेश फरतारे, गणेश फरतरे, राहुल मधे, आनंदा केदार, सत्यवान करंजेकर, सिताराम केदार, विष्णू खैरे, पंडित खैरे, बाबाजी खैरे, युवा नेते सचिन बबन पवार, दत्ता बर्डे, कैलास वाघ, मन्सूर पटेल, अशोक फरतारे, सारंगधर फरतारे, ज्ञानदेव पवार, मा. रंगनाथ पवार, भाऊसाहेब फारतारे, अण्णा दरेकर, गणपत शिंदे, रोहिदास दरेकर, गोवर्धन गायकवाड, गणपत रामू पवार, गणेश पवार, गोपीनाथ खैरे, मच्छिंद्र फरतरे, गोरख फरतारे, संपत आहेर, गणपत मधे, विलास गावडे, तुकाराम मधे, भाऊसाहेब मधे, लक्ष्मण मधे, अर्जुन मधे, पोपट मधे, संजय मधे, शरद भुतांबरे, झुंबर मधे, उंबर पटेल, पोपट कसबे, पोपट वाघ, बबन ढेरे, सूर्यभान खैरे, शिवाजी बर्डे, सर्जेराव शिंदे, गुलाब बर्डे, राजेंद्र भारथारे, कुंडलिक पवार, सुखा पवार, बाळू कांबळे आदी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

## संत सदगुरु गोदड महाराजांचा जन्मोत्सव भक्तीभावाने साजरा

### हजारो भाविकांनी घेतला शिपी आमटी महाप्रसादाचा लाभ

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** कर्जतचे ग्रामदैवत श्री संत सदगुरु गोदड महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा शनिवार, दि २२ रोजी जन्मस्थळी आणि समाधी मंदिर स्थळी मोठ्या उत्साहात साजरा झाला. यावेळी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यासह दोन्ही ठिकाणी महाप्रसाद ठेवण्यात आला होता. या महाप्रसादाचा लाखो भाविकांनी लाभ घेतला. शुक्रवारी संध्याकाळी जन्मोत्सवानिम्मित महिलांनी डोक्यावर कलश घेत हरिनामाच्या गजरात कर्जत शहरात ग्रामप्रदक्षिणा पार पाडली.

कर्जतचे ग्रामदैवत संत सदगुरु गोदड महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला. याप्रसंगी श्री संत सदगुरु



गोदड महाराज चरित्र पारायण संपन्न झाले.

शनिवारी पहाटेपासून भाविक-भक्तांनी श्री संत सदगुरु गोदड महाराजांचा रुद्राभिषेक करीत दर्शन घेतले. यावेळी जन्मस्थळी आणि मंदिरात मोठ्या प्रमाणात भाविकांच्या दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. जन्मस्थळी हभप दयानंद महाराज कोरेगावकर तर समाधी मंदिरस्थळी हभप माऊली महाराज पठाडे यांचे कीर्तन संपन्न झाले. कीर्तनात भाविक-भक्त तल्लीन झाले होते.

गोदड महाराज मंदिरात कर्जत पंचक्रोशीतील समस्त ग्रामस्थ, मानकरी, पुजारी व सर्व भजनी मंडळीच्यावतीने तर जन्मस्थळी कर्जत पंचक्रोशीतील समस्त ग्रामस्थ, सदगुरु गोदड महाराज जन्मस्थळ मंदीर ट्रस्ट, कर्जत तालुका जन्मोत्सव समिती आणि पै प्रवीणदादा घुले मित्रमंडळाच्यावतीने शिपी आमटीचा महाप्रसाद ठेवण्यात आला होता.

भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ मोठ्या संख्येने घेतला. दोन्ही ठिकाणी कार्यक्रम यशस्वीतेसाठी स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी सदगुरु गोदड महाराजांचे दर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेतला.

## पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांतून घडते गुणवत्तेची पिढी : शिक्षणाधिकारी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शिशु संगोपन संस्थेच्या सविता रमेश फिरोदिया प्रशाला व श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूलमध्ये विविध शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी सौ. संध्या गायकवाड यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या मेहनतीला संस्थेचे प्रोत्साहन, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे पाठबळ लाभल्यास शैक्षणिक क्षेत्रात निश्चितपणे मोठे यश संपादन करता येते, याचा प्रत्यय या गौरव सोहळ्यातून आला. शिशु संगोपन संस्थेच्या सविता रमेश फिरोदिया व श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूलमध्ये विविध शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी दिलीप गुंदेचा, दशरथ खोसे, र. धों. कासवा, राजेश झालानी, विश्वस्त शिवनारायण वर्मा, संतोष पिपाडा, विनोदजी कटारिया, माजी मुख्याध्यापक एल. के. आव्हाड, माजी प्राचार्य के. जी. गावडे, मुख्याध्यापिका योगिता गांधी, प्राचार्य दत्तात्रय कसबे आदीसह शिक्षक, विद्यार्थी. पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

# शहराला दिवसाआड पाणीपुरवठा होणार : नगराध्यक्ष आव्हाड

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** शहरासाठी वरदान ठरणाऱ्या जायकवाडी पाणीपुरवठा योजनेचे काम अंतिम टप्प्यात आले असून शहरांतर्गत येणाऱ्या वाढीव पाईपलाईनच्या कामाचा प्रस्ताव विभागीय पातळीवर सादर आहे. आमदार मोनिका राजळे यांच्या नेतृत्वाखाली शासनाकडे पाठपुरावा सुरू असून लवकरच मंजुरी मिळेल. नव्या योजनेमुळे शहरवासीयांना दिवसाआड पिण्यासाठी पाणी मिळू शकेल. अशी माहिती नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी दिली.

पाणी योजनेच्या कामाबाबत पत्रकारांनी आव्हाड यांच्याशी चर्चा केली. याबाबत माहिती देताना आव्हाड म्हणाले, नुकताच नाशिक जिल्ह्यात जोरदार पाऊस झाला. यामुळे शहराला पाणीपुरवठा करणारे जायकवाडी धरण पूर्ण क्षमतेने भरले. पिण्याचा पाण्याचा प्रश्न मिटला असला तरी पाणी योजनेच्या माध्यमातून शहरवासीयांना स्वच्छ, पुरेसे व नियमित पाणी देण्याबाबत युद्धपातळीवर नियोजन सुरू आहे. यासाठीचे बहुतेक सर्व



अडथळे दूर झाल्याने उद्भवाच्या ठिकाणी हंगामी पाणी उपसा योजना कार्यान्वित करण्याचे आदेश आमदार मोनिका राजळे यांनी दिले. त्यानुसार धरणाच्या भिंतीकडील बाजूने कायमस्वरूपी मोठी होडी वापरून पाणबुडी वीज पंपाच्या साह्याने पाण्याचा उपसा करून ते पाणी जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पोहोचेल. तेथून शहराच्या वितरण टाक्यांमध्ये येऊन त्याचे वितरण होईल. शहराची सध्याची गरज सर्वसाधारणपणे ३० ते ३५ लाख लिटर दैनंदिन असून नव्या योजनेच्या माध्यमातून दैनंदिन किमान ४० लाख लिटर पाणी मिळणार आहे. जास्त पाणी मिळणार असले तरी आवर्तन पद्धतीने विविध विभागांना मिळून दिवसाआड पाणी मिळणे शक्य होईल. आमदार राजळे यांनी पुढाकार घेतल्याने शेवगाव शहरातील पाईपलाईनच्या कामातील अडथळा सुद्धा दूर झाला आहे. पालिका कार्यालयात आमदारांनी सर्व सदस्यांसह पालिका प्रशासन, संबंधित एजन्सीचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक, कामाचा आढावा घेतला. कामातील अडथळे दूर झाल्याने काम करणाऱ्या एजन्सीने आता कुठल्याही प्रकारची कारणे पुढे न करता काम पूर्ण करावे, सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना आमदारांनी दिल्या. जॅकवेल मधून पाणी उपसण्यासाठी हंगामी स्वरूपात पाणबुडीचा वापर करण्यासाठी लागणाऱ्या आर्थिक तरतुदी बाबत पालिकेने तयारी दर्शविली आहे. शहरातील अंतर्गत पाणीपुरवठा यंत्रणांची कामे पूर्ण झाली असून उपनगरातील सुमारे ४५ किलोमीटर लांबीच्या वाढीव पाईप लाईनच्या कामाची मंजुरी आमदार राजळे यांच्या पाठपुराव्यामुळे लवकरच मिळून कामाला तातडीने प्रारंभ होणार आहे. सध्या जायकवाडी धरण पूर्ण क्षमतेने भरलेले असल्याने हेड वर्क चे काम सध्या काही दिवस करता येणार नाही. मात्र तोपर्यंत निव्वळ वाट पाहण्यापेक्षा तात्पुरत्या स्वरूपात पाणबुडी वीजपंपाच्या साह्याने पाणी उपसण्याबाबत लक्ष केंद्रित करावे, यावर बैठकीत सर्वांचे एकमत झाले. योजनेची प्रकल्प किंमत शंभर कोटी रुपयांपर्यंत अंतिमतः होईल, अशी शक्यता आहे. दरडोई १३५ लिटर पाणी मिळणार असून नव्या योजनेचे नियोजन २०५१ सालची लोकसंख्या गृहीत धरून करण्यात आले आहे. शहराला मुबलक पाणी मिळणार असले तरीही पाणी वाया जाऊ नये म्हणून प्रत्येक नळ धारकाला मीटरने पाणी देण्याबाबत पालिकेने गांभीर्याने विचार करावा. या मुद्द्याकडे जिल्हा प्रशासनाने पालिकेचे लक्ष वेधले आहे.

## भाजपच्या चव्हाणांनी घेतली आ. पाचपुतेंच्या कार्याची दखल

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्रजी चव्हाण यांनी श्रीगोंदा-नगर विधानसभा मतदारसंघाचे आ. पाचपुते यांच्या विधानसभेतील प्रभावी भाषणशैली, मुद्दे मांडण्याची पद्धत आणि आजवरच्या राजकीय वाटचालीचे कौतुक करत, विक्रम पाचपुते यांना पक्षासाठी राज्यपातळीवर काम करण्याची संधी आपण सर्वांनी द्यावी, असे आवाहन केले. माजी मंत्री बबनराव पाचपुते व प्रतिभाताई पाचपुते यांच्या उपस्थितीत तसेच स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि जनसमुदायासमोर प्रदेशाध्यक्षांनी व्यक्त केलेल्या या विश्वासामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या श्रीगोंदा दौऱ्यादरम्यान ऐतिहासिक श्रीगोंदा नगरीत विविध ठिकाणी पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. त्यानंतर काष्टी येथील माजी मंत्री बबनदादा पाचपुते यांच्या निवासस्थानी त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी आ. ॲड. पाचपुते यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ज्ञानशिल्पाचे उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते लोकार्पण

## सावित्रीबाईंच्या विचारांची ज्योत पिढ्यान्पिढ्या तेवत राहील : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याची आणि परिवर्तनवादी विचारांची साक्ष देणाऱ्या २८ ज्ञानशिल्पांचे लोकार्पण करण्याचे भाग्य लाभणे हा माझ्यासाठी मनस्वी आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण आहे. या ज्ञानशिल्पांतून शिक्षण, मानवता, समता, सामाजिक न्याय आणि परिवर्तनाचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचेल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित ज्ञानशिल्प लोकार्पण समारंभात त्या बोलत होत्या. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, कुलसचिव प्रा. डॉ. कपिल पवार, विद्यापीठाच्या आयोजन समितीचे अध्यक्ष राजेश पांडे, विविध व्यवस्थापन मंडळांचे सदस्य, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि सामाजिक समतेसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कार्याचे ऋण आपण कधीही फेडू शकत नाही. त्यांनी केवळ एका पिढीला शिक्षण दिले नाही, तर पुढील अनेक पिढ्यांसाठी परिवर्तनाची वाट निर्माण केली. सावित्रीबाईंच्या जीवनकार्याचे विविध पैलू या ज्ञानशिल्पांतून मांडण्यात आले आहेत. पुण्यातील भिडेवाड्यात पहिली मुलींची शाळा सुरू करणे, पहिल्या महिला शिक्षिका म्हणून कार्य करणे, बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना, कवयित्री व साहित्यिक म्हणून योगदान, सत्यशोधक चळवळीत सहभाग आणि प्लेगच्या महामारीत रुग्णांची सेवा करणे, अशा अनेक कार्यांचा यात समावेश आहे. या ज्ञानशिल्पांमध्ये आरसा लावून त्याखाली 'मी कोण?' असा प्रश्न विचारण्यात आला आहे. त्या आरशात पाहताना मलाही हा प्रश्न पडला. पुढच्या क्षणी जाणवले की मी सावित्रीची लेक आहे. एका छोट्या गावातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या माझ्यासारख्या मुलीला आज महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली, यामागे सावित्रीबाईंच्या कार्याची प्रेरणा आहे. त्याबद्दल मी सदैव ऋणी आहे, असे उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या.विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित ज्ञानशिल्पांच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षमय जीवनाचा, शैक्षणिक कार्याचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा परिचय नव्या पिढीला होणार आहे. ज्ञानशिल्पांमधून सावित्रीबाईंच्या जीवनातील विविध पैलू साकारण्यात आले आहेत.

यावेळी शिल्पकार नवीन शेगमवार, आर्किटेक्ट धनंजय सालकर तसेच यासाठी समितीच्या माध्यमातून कामगिरी केलेले प्रा. डॉ. संजय चाकणे यांचाही विशेष गौरव करण्यात आला. आभार कुलसचिव प्रफुल्ल पवार यांनी मानले.

### ज्ञानशिल्पांची उपमुख्यमंत्र्यांकडून पाहणी :

लोकार्पणानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विद्यापीठ परिसरातील सर्व २८ ज्ञानशिल्पांची पाहणी केली. प्रत्येक शिल्पाची माहिती जाणून घेत त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याचे विविध पैलू समजून घेतले. या ज्ञानशिल्पांची संकल्पना, त्यामागील उद्देश आणि निर्मितीत सहभागी झालेल्या सर्वांचे त्यांनी कौतुक केले.



## दखल

### विमानतळ परिसरासह लोहगाव-वाघोलीतील स्वच्छतेची पाहणी

**पुणे :** पुणे विमानतळ परिसरासह महापालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या लोहगाव व वाघोली परिसरातील स्वच्छता व्यवस्थेची महापालिका प्रशासनाकडून पाहणी करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त प्रजीत नायर यांनी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संतोष वारुळे यांच्या समवेत विविध भागांना भेट देऊन स्वच्छतेचा आढावा घेतला.

यावेळी अतिरिक्त आयुक्त नायर यांनी डीएसआय, एसआय तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांशी संवाद साधून कचरा संकलन, रस्ते सफाई आणि कचरा वाहतुकीची माहिती घेतली. नव्याने समाविष्ट गावांमध्ये नागरिकांना नियमित व प्रभावी स्वच्छता सेवा मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. घरोघरी कचरा संकलन अधिक प्रभावी करणे, कचरा संकलनाचे क्षेत्र वाढविणे, कचरा वाहतुकीचे योग्य नियोजन करणे तसेच रस्ते सफाई अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना अतिरिक्त आयुक्त नायर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

### कामगाराचा खून; दोन संशयितांचा शोध

**वाघोली :** कामगारांमध्ये झालेल्या वादातून एका कामगाराच्या डोक्यात टणक वस्तूने मारहाण करून खून केल्याची घटना आव्हाळवाडी रोड येथील स्नेहालय विकलांग संस्था येथे घडली. याप्रकरणी वाघोली पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, फरार झालेल्या दोन संशयितांचा पोलिस शोध घेत आहेत.

धीरेंद्र पासवान (वय ३७, रा. गोरखपूर, उत्तर प्रदेश) असे मृत कामगाराचे नाव आहे. याबाबत सुपरवायझर नितेश पाटील (वय ३९, रा. वडगाव शेरी) यांनी फिर्याद दिली आहे. स्नेहालय संस्थेच्या इमारतीत रंगकामाचे काम सुरू असून, त्यासाठी धीरेंद्र पासवान याच्यासह तीन कामगार तेथे काम करीत होते. त्यांची राहण्याची व्यवस्था इमारतीच्या वरच्या मजल्यावर करण्यात आली होती. बुधवारी रात्री काम आटोपल्यानंतर सुपरवायझर पाटील घरी गेले.

गुरुवारी सकाळी ते कामाच्या ठिकाणी आले असता धीरेंद्र वरच्या मजल्यावर झोपलेल्या अवस्थेत आढळून आला. त्याच्या डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याचे दिसून आले. घटनेची माहिती मिळताच वाघोली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. धीरेंद्रच्या डोक्यात टणक वस्तूने मारहाण करून खून करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. त्याच्यासोबत राहणारे सुनिल कुमार आणि कमलेश हे दोघे घटनास्थळी आढळून आले नाहीत. त्यामुळे पोलिसांचा संशय त्यांच्यावर असून, त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिस पथके रवाना करण्यात आली आहेत. खुनामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, वादाचे कारण शोधण्यासाठी पोलिस तपास सुरू आहे.

### आधी आरपी रस्ता, मगच उड्डाणपूल

**वाघोली :** वाघोली परिसरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता उड्डाणपूल व मेट्रो प्रकल्पाचे काम सुरू करण्यापूर्वी पर्यायी आरपी रस्ता पूर्ण करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत वाघोली येथे उड्डाणपूल व मेट्रो प्रकल्पाला मंजुरी मिळाल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. मात्र, गेल्या १५ वर्षांत वाघोलीची लोकसंख्या सुमारे पाचपट वाढल्याने वाहतुकीचा प्रश्न गंभीर झाला आहे.

सकाळी ८ ते १० आणि सायंकाळी ४ नंतर वाघोली चौकातून बाहेर पडण्यासाठी एक ते दीड तास लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होत असून विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, रुग्णवाहिका व नोकरदारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.उड्डाणपूल आणि मेट्रोची कामे एकाचवेळी सुरू झाल्यास पर्यायी मार्ग उपलब्ध नसल्याने वाहतूक कोंडी आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे 'आधी पायाभूत सुविधा आणि मग मोठे प्रकल्प' या धोरणानुसार प्रथम आरपी रस्ता व वाघोली-नगर रोडला जोडणारा पर्यायी मार्ग पूर्ण करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

विकासकामांना विरोध नसून, कामांच्या काळात नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी नियोजन आवश्यक आहे. त्यामुळे प्रथम पर्यायी रस्ता पूर्ण करून त्यानंतर उड्डाणपूल व मेट्रोचे काम सुरू करावे, अशी मागणी लोकसेवा परिवर्तन फाउंडेशनचे अध्यक्ष केतन जाधव यांनी केली.

### खासगी शिकवणी केंद्रांच्या नियमनासाठी मसुदा ४ सप्टेंबरपर्यंत सूचना-हरकती

**पुणे :** राज्यातील खासगी शिकवणी केंद्रांची नोंदणी व नियमन करण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्याच्या दृष्टीने शासनाने 'महाराष्ट्र खासगी शिकवणी केंद्र (नोंदणी व विनियमन) अधिनियम, २०२६' या कायद्याचा प्रारूप मसुदा तयार केला आहे. या मसुद्यावर नागरिकांकडून सूचना व हरकती मागविण्यात आल्या आहेत.हा प्रारूप मसुदा शालेय शिक्षण विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

नागरिकांनी आपल्या सूचना व हरकती ४ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, डॉ. ॲनी बेझंट रोड, पुणे-४११००१ किंवा शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, डॉ. ॲनी बेझंट रोड, पुणे-४११००१ येथे सादर कराव्यात, असे शासनाने आवाहन केले आहे.केंद्र शासनाने १६ जानेवारी २०२४ रोजी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांसह देशातील विविध राज्यांमधील खासगी शिकवणी केंद्रांशी संबंधित कायदे व नियमांचा अभ्यास करून हा मसुदा तयार करण्यात आला आहे.

# विरोधकांना निवडणुकीच्या वेळी लाडकी बहीण आठवली : खा. संजय राऊत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



> फुटीर गट न्यायालयात युक्तिवाद करू शकत नाही ते फक्त त्यांचे म्हणणं मांडू शकतात
>
> – खा. संजय राऊत

**पिंपरी, पुणे :** कलाकारांना, क्रीडापटूंना, सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना राजाश्रय मिळाला पाहिजे. हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी नेहमीच अशा व्यक्तींचा सन्मान केला आहे. रक्तदान आणि आरोग्य शिबिरांची चळवळ बाळासाहेब ठाकरे यांनी सुरू केली. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून उद्धव ठाकरे जबाबदारीने काम करीत आहेत. कोरोना काळात अवघे जग ठप्प झाले असताना त्यांनी स्वतःच्या कुटुंबाप्रमाणे महाराष्ट्रातील जनतेची जबाबदारी घेतली होती. याची दखल सर्वोच्च न्यायालयाने देखील घेतली आहे. त्यांच्या नावे दिलेले पुरस्कार हा सन्मान आहे. जिथे संकट तिथे शिवसेना अशा पद्धतीने सर्वसामान्यांचे प्रश्न घेऊन शिवसेना काम करीत आहे. शिवसेनेने अगोदर काम केले आणि मग मतं मागितली. तर विरोधकांना निवडणुकीच्या वेळी लाडकी बहीण आठवली अशी बोचरी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केली.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी चिंचवड शहर शिवसेनेच्या वतीने उद्धव श्री पुरस्कार २०२६ चे वितरण खासदार संजय राऊत आणि माजी खासदार विनायक राऊत यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी खा. विनायक राऊत यांनी सांगितले की, सध्या राजकारणात पुढे पुढे करणाऱ्यांचे दिवस आहेत. प्रामाणिक माणसांच्या पदरी उपेक्षा पडत आहे, परंतु शिवसेनेच्या माध्यमातून पुरस्कार देऊन सन्मान केला जात आहे. महाराष्ट्रातील ३६ हजार उद्योग बंद पडले आहेत हे महाराष्ट्राला लाजिरवाणे आहे. उद्योजकांना दिलासा देण्या ऐवजी त्रास दिला जात आहे. महाराष्ट्रात त्यांच्यावर सर्वात जास्त टॅक्स लावला आहे. या पुरस्कार सोहळ्याचे उत्कृष्ट नियोजन करणाऱ्या चेतन पवार यांच्यावर उद्धव ठाकरे यांचा पूर्ण विश्वास आहे असे माजी खा. विनायक राऊत यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड शहर प्रमुख चेतन पवार यांनी स्वागत, प्रास्ताविक करताना सांगितले की, हा पुरस्कार म्हणजे त्यांच्या सामाजिक कार्याचा सन्मान आहे. यातील अनेकांनी कोरोना सारख्या जोखीम काळात देखील पुढे येऊन आपले कर्तव्य बजावले आहे.

डॉ. संतोष लाटकर (वैद्यकीय), डॉ. रोहन काटे (वैद्यकीय), प्रा. तुकाराम पाटील (साहित्यिक), काशिनाथ नखाते (कामगार), प्रीती वैद्य (सामाजिक), चांद पाशा अहमद हुसेन तांबोळी (क्रीडा) पै. योगेश्वर तापकीर (क्रीडा) भाग्यश्री मोरे (सामाजिक), रामदास काटे (कृषी) आणि डॉ. संजीव कुमार पाटील (कला), शौर्या भरणे (क्रीडा), रियाज शेख (कुस्ती) आणि भाग्यश्री मोरे (दिव्यांगांसाठी कार्य) यांचा उद्धव श्री पुरस्कार २०२६ सन्मान करण्यात आला.

यावेळी वाकड, पुनावळे, ताथवडे, पिंपळे सौदागर, पिंपरी चिंचवड, पिंपळे निलख येथील युवक आणि युवतींनी शिवसेनेत प्रवेश केला त्यांचे खा. संजय राऊत यांनी स्वागत केले.

यावेळी माजी आमदार गौतम चाबुकस्वार तसेच रोमी संधू, मावळ तालुका प्रमुख आशिष ठोंबरे, पिंपरी चिंचवड संपर्क प्रमुख लतिकाताई पाष्टे, सुशीला पवार, विजय सुळे, गजानन थरकुडे, सुनील सावंत, ज्ञानेश्वर शिंदे, ज्योती भावे, सचिन मगर, नितीन घोलप आदीं उपस्थित होते.

# पोलीस उपनिरीक्षकावरील आरोपांची निष्पक्ष चौकशी करा

**डॉ. नीलम गोऱ्हे यांची पुणे पोलीस आयुक्तांकडे मागणी**

**पुणे :** हडपसर परिसरातील पोलीस उपनिरीक्षक धनाजी रंगराव टोणे यांच्याविरुद्ध करण्यात आलेल्या गंभीर आरोपांची निष्पक्ष व सखोल चौकशी करावी. तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करून तपासापासून दूर ठेवावे, अशी मागणी शिवसेना नेत्या तथा विधानपरिषद सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुणे पोलीस आयुक्तांकडे केली आहे.

संबंधित महिलेने पतीकडून मारहाण, मानसिक व शारीरिक छळ, धमकी तसेच गर्भलिंग तपासणीनंतर मुलगी असल्याचे समजल्यानंतर इच्छेविरुद्ध गर्भपातासाठी दबाव आणल्याचे आरोप केल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. संबंधित व्यक्ती पोलीस दलातील अधिकारी असल्याने आपल्या पदाचा किंवा अधिकाराचा गैरवापर करून पत्नीवर दबाव आणल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

गर्भलिंग तपासणी आणि त्यानंतर गर्भपातासाठी दबाव आणल्याचे आरोप अत्यंत गंभीर आहेत. या प्रकरणात कोणत्याही प्रकारची दडपशाही होऊ नये, यासाठी स्वतंत्र, निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी होणे आवश्यक आहे, असे डॉ. गोऱ्हे यांनी पत्रात म्हटले आहे. संबंधित अधिकारी पोलीस दलात कार्यरत असल्याने त्यांच्या पदाचा तपासावर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष प्रभाव पडण्याची शक्यता आहे. गर्भलिंग तपासणी व गर्भपातासंदर्भातील आरोपांची संबंधित कायद्यांनुसार स्वतंत्र चौकशी करावी. तपासादरम्यान वैद्यकीय अहवाल, कागदपत्रे, पुरावे आणि संबंधितांचे जबाब यांची योग्य पद्धतीने नोंद घेऊन तपास पारदर्शक ठेवावा. आरोप प्रथमदर्शनी सत्य आढळल्यास संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध कठोर विभागीय तसेच कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणीही डॉ. गोऱ्हे यांनी केली.

'महिलांच्या सुरक्षिततेबाबत शून्य सहनशीलता आवश्यक':

पोलीस दलातील अधिकारीच आपल्या पदाचा गैरवापर करून महिलेला त्रास देत असल्याचे आरोप होत असतील, तर अशा प्रकरणात पोलीस प्रशासनाने तातडीने कठोर आणि उदाहरणात्मक कारवाई करणे आवश्यक आहे. महिलांच्या सुरक्षिततेबाबत शासन आणि पोलीस प्रशासनाने शून्य सहनशीलतेची भूमिका ठेवली पाहिजे, असेही डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केले.

# इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील विशेष फेरीचे वेळापत्रक जाहीर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत अद्याप प्रवेश निश्चित न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष फेरीचे आयोजन करण्यात आले असून, विद्यार्थ्यांनी या अंतिम फेरीत प्रवेश निश्चित करून घेण्याचे आवाहन माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने केले आहे.

संचालनालयाने दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत १५,५२,६७८ लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून १३,४३,४१८ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. मात्र, काही विद्यार्थ्यांनी अद्याप प्रवेश निश्चित न केल्यामुळे ही विशेष फेरी आयोजित करण्यात आली आहे. या फेरीसाठी २३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता रिक्त जागांची माहिती प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर २३ ऑगस्ट दुपारी १ वाजल्यापासून २४ ऑगस्ट सायंकाळी ६ वाजेपर्यंत नवीन विद्यार्थ्यांना नोंदणी, भाग-१ मधील दुरुस्ती तसेच भाग-२ भरून अर्ज लॉक करण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे. विद्यार्थ्यांनी किमान १० कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदविणे अनिवार्य राहणार आहे.

प्रवेश वाटप प्रक्रिया २५ ऑगस्ट २०२६ रोजी राबविण्यात येणार असून त्याच दिवशी दुपारी ३ वाजता प्रवेश वाटपाची यादी, कट-ऑफ यादी तसेच विद्यार्थ्यांना एसएमएसद्वारे माहिती उपलब्ध करून देण्यात येईल. वाटप झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी २५ ऑगस्ट ते २७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत आवश्यक कागदपत्र पडताळणी व शुल्क भरून प्रवेश निश्चित करावेत. यानंतर २८ ऑगस्ट रोजी संबंधित प्रशासकीय कामकाज, २९ ऑगस्ट रोजी डेटा प्रोसेसिंग आणि ३० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता रिक्त जागांची पुढील माहिती प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

# तहसीलदार अरुण शेलार यांची उपजिल्हाधिकारीपदी पदोन्नती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**दौंड :** दौंड तालुक्यासाठी अभिमानास्पद बाब असून, तहसीलदार अरुण शेलार यांची उपजिल्हाधिकारीपदी पदोन्नतीसाठी निवड झाली आहे. त्यांच्या या पदोन्नतीबद्दल दौंड तालुक्यासह पुणे जिल्ह्यातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

महसूल विभागातील कार्यक्षम अधिकारी म्हणून तहसीलदार अरुण शेलार यांनी आपल्या प्रशासकीय कामकाजातून वेगळी ओळख निर्माण केली आहे. महसूल विभागातील आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, ई-फेरफारसारख्या आधुनिक महसुली प्रणालीच्या प्रशिक्षणातील सहभाग तसेच प्रशासकीय कामकाजातील कार्यक्षमतेमुळे त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

दौंड तालुक्यातील प्रशासकीय जबाबदारी सांभाळताना त्यांनी विविध महसुली कामांना गती देण्यावर भर दिला. त्यांच्या कामाची पद्धत आणि प्रशासकीय कार्यक्षमतेची दखल घेत त्यांची उपजिल्हाधिकारीपदी पदोन्नतीसाठी निवड झाली आहे. त्यांच्या पदोन्नतीमुळे दौंड तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या पुढील प्रशासकीय कारकिर्दीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छा व्यक्त होत आहेत.

# शिष्यवृत्तीच्या यशाची अनोखी गुरुदक्षिणा; नरवडे सरांना पालकांकडून दुचाकी भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**पाबळ :** यावर्षीपासून इयत्ता चौथीसाठी सुरू करण्यात आलेल्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत कान्हूर मेसाई येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. प्रथमच शिष्यवृत्ती परीक्षेला सामोरे जात असताना शाळेतील तब्बल नऊ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्तायादीत स्थान मिळविले. गुणवत्तायादीत हिंदवी शंकर ननवरे हिने २७६ गुण मिळवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. रिदा रियाज मुलाणी व सान्वी योगेश पुंडे यांनी प्रत्येकी २६० गुण, ईश्वरी विलास सुरवसे हिने २५८, स्वरा सचिन ननवरे व अनुष्का राहुल पुंडे यांनी प्रत्येकी २५४, दुर्वांक गणेश पुंडे याने २५२, मनीष आनंदा पुंडे याने २४८, तर नित्या योगेश पुंडे हिने २४४ गुण मिळविले.या विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक किरण नरवडे सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशामागे वर्षभर घेतलेले अतिरिक्त तास, सातत्यपूर्ण अध्यापन, विद्यार्थ्यांची अभ्यासाची आवड आणि पालकांचे प्रोत्साहन महत्त्वाचे ठरले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत इयत्ता चौथीच्या पालकांनी व शाळा व्यवस्थापन समितीने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून वर्गशिक्षक किरण नरवडे यांना गुरुदक्षिणा म्हणून दुचाकी भेट दिली.मुख्याध्यापक किसन हरपुडे सर, सहकारी शिक्षक पाटील गोरडे आणि पल्लवी गायकवाड यांचेही विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन लाभले.मुख्याध्यापक हरपुडे यांनी सांगितले की, वर्गशिक्षकांची मेहनत, अध्यापनातील सातत्य, वर्षभर घेतलेले अतिरिक्त तास, विद्यार्थ्यांची अभ्यासातील आवड, पालकांचे प्रोत्साहन, शिक्षकांवरील विश्वास आणि शाळा व्यवस्थापन समितीची खंबीर साथ यामुळे हे यश मिळाले.शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय पुंडे , सर्व संचालक मंडळ, ग्रामपंचायत प्रशासक आशिया तांबोळी , योगेश पुंडे, शांताराम ननवरे, दिनेश पुंडे, अमोल पुंडे, बबनदादा शिंदे, तसेच विद्या विकास मंडळाचे सचिव सदाशिवराव पुंडे यांच्यासह गावातील आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले. यावेळी विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे, मेडल्स व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

# चाकण तळेगावमधील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रशासन 'ॲक्शन' मोडवर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे/ पिंपरी चिंचवड :** चाकण तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूला होणाऱ्या अवजड वाहनांच्या अनधिकृत पार्किंगवर कारवाई करत आता वाहतूक प्रशासन 'ॲक्शन' मोड मध्ये आले आहे.

या अंतर्गत कालपासून तब्बल ५० हून अधिक अवजड वाहनांना टो करून इतरत्र स्थलांतरीत करण्याबरोबरच त्यांच्याकडून चलन वसूली करण्यात येत असल्याची माहिती पिंपरी चिंचवड वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विक्रांत देशमुख यांनी दिली.

चाकण आणि तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील वाढती वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरवस्था, अनधिकृत पार्किंग आणि अतिक्रमणांच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी काही दिवसांपूर्वी दिले होते, याच पार्श्वभूमीवर सदर कारवाई करण्यात आली आहे.

चाकण तळेगाव औद्योगिक परिसरात मोठ्या संख्येने उद्योग आणि कंपन्या असल्याने दररोज हजारो कामगारांची वाहतूक तसेच अवजड वाहनांची ये-जा या ठिकाणी सुरू असते. त्यामुळे अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे, ही समस्या सोडविण्यासाठी आता ही कारवाई सुरु करण्यात आली असून प्रशासनाच्या वतीने या संदर्भात स्थानिक पातळीवर आवाहन देखील करण्यात येत असल्याचे देशमुख यांनी नमूद केले.

द·ख·ल



## राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाच्या कर्जत तालुकाध्यक्षपदी रघुनाथ काळदाते

**शेवगाव :** राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या कर्जत तालुक्याच्या नवनिर्वाचित तालुकाध्यक्षपदी रघुनाथ आबा काळदाते यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा आईसाहेब युवा प्रतिष्ठानच्या वतीने उत्साहात सत्कार करण्यात आला. आईसाहेब युवा प्रतिष्ठानचे पै. दीपक भाऊ काळे व पै. विजय नाना मोढळे यांच्या वतीने रघुनाथ आबा काळदाते यांचा हार, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी काळदाते यांना पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी सतीश गोडसे, नवनाथ काळे, निखिल काळे, महेश शेठ काळे, राहुल कापसे, बाळू काळे, शरद काळे, सचिन सपाटे, बापू जगताप, महेश काळे, अतुल कानगुडे यांच्यासह कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. कर्जत तालुक्यात पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी तसेच सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष रघुनाथ आबा काळदाते यांच्या नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची ठरणार असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

## हनुमान देवस्थानच्या वर्धापन दिनानिमित्त भव्य किर्तन महोत्सव

**शिराळ चिचोंडी :** चिचोंडी येथील दोन मुखी हनुमान मंदिराच्या बाराव्या वर्धापन दिनानिमित्त दररोज सकाळी सहा वाजता काकडा आरती भजन रात्री सात ते नऊ कीर्तन त्यानंतर अन्नदान चोंडी ग्रामस्थ तरुण मंडळाच्या सहकार्यातून भव्य दिव्य दोन मुखी हनुमानाचे मंदिर बांधण्यात आले आहे या मंदिरात वेद धार्मिक कार्यक्रमाची आयोजन करण्यात येते. या सप्ताहात माजी खासदार सुजय विखे, कार्यसम्राट आ. मोनिकाताई राजळे,हिंदुत्ववादी आ. अक्षय कर्डिले व अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सप्ताकाळात चिचोंडी गावात महिला दररोज सकाळी घरासमोर सडा रांगोळी करतात तसेच गावात आठ दिवस भक्तिमय वातावरण तयार होते. सप्ताह यशस्वी करण्याकरता गावातील सर्व लहान थोर तरुण मंडळ मोठ्य, हिरहिरीनेभाग घेतात



## गणेश रांधवणे यांची भाजपा ओबीसी मोर्चाच्या प्रदेश कार्यकारणीवर निवड

**शेवगाव :** शेवगाव येथील भारतीय जनता पार्टीचे सक्रिय कार्यकर्ते गणेश रांधवणे यांची भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस व भाजपाचे प्रदेशाध्यक्ष श्री. रवींद्रजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनानुसार, ओबीसी मोर्चाचे प्रभारी आमदार श्री. योगेशजी सागर आणि ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष आमदार श्री. योगेशजी टिळेकर यांनी गणेश रांधवणे यांची महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य म्हणून निवड केली. रांधवणे यांच्या निवडीबद्दल पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार मोनिका राजळे, भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, शेवगाव तालुकाध्यक्ष महेश फलके तसेच श्री. संजय टाकळकर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. गणेश रांधवणे यांच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणीवरील निवडीचे विविध सामाजिक, राजकीय तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून स्वागत होत आहे. त्यांच्या माध्यमातून ओबीसी समाजाच्या विविध प्रश्नांना संघटनात्मक पातळीवर अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी प्रयत्न होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



## श्रावणात पाथर्डीच्या शिव मंदिरावर विद्युत रोषणाई

**पाथर्डी :** श्रावण महिन्यामध्ये अभय आव्हाड प्रतिष्ठान तर्फे प्रमुख शिव मंदिरांवर विद्युत रोषणाई करण्यात आली. प्रथमच शहरात अशा प्रकारचा उपक्रम संपन्न झाल्याने भाविकांमध्ये समाधान पसरले आहे. शहरामध्ये खोलेश्वर तपनेश्वर अशी विविध प्रमुख प्राचीन शिव मंदिरे आहेत. सर्वच शिवमंदिरांमध्ये शिवभक्तांची मोठी गर्दी सध्या वाढली असून पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होतात खोलेश्वरची शिवपिंड पूर्वाभिमुख असून अशी वैशिष्ट्यपूर्ण ऐतिहासिक व दुर्मिळ शिवपिंड सहसा आढळत नाही. श्रावण महिना अत्यंत पवित्र मानला जात असल्याने धार्मिक उपक्रमांचे भाविकांकडून आयोजन होते. गावोगावी विविध ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह शिव पूजा महाआरत्या असे कार्यक्रम होतात. शहराच्या सामाजिक सांस्कृतिक उपक्रमांमध्ये अभय आव्हाड प्रतिष्ठाण अग्रेसर राहुल अनेक गरजूंना यापूर्वी मदत केली आहे गुणवंतांचे गौरव समारंभ संपन्न केले आहेत. यावर्षी प्रतिष्ठाणचे संस्थापक, तथा नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी अशा उपक्रमाचे नियोजन केले. प्रतिष्ठाणच्या कार्यकर्त्यांकडे भाविकांनी प्राचीन मंदिरा वर श्रावण महिन्यानिमित्त रोषणाई करण्याची मागणी केल्यास मागणीचा विचार केला जाईल. गावाचे धार्मिक व सांस्कृतिक वातावरण पाहता प्रतिष्ठाण कडून केलेल्या कार्याचे शहरातील सर्व स्तरातील भाविकांनी कौतुक केले आहे.

## सर्व शाळांनी अन्न सुरक्षेची मानके कायद्याची अमंलबाजवणी करा : भोईटे

**शेवगाव :** प्रधानमंत्री पोषण शक्ती आहार योजनेसाठी अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ ची प्रभावी अमंलबजावणी करून विद्यार्थ्यांना सुरक्षित, सकस व संतुलित आहार देण्याचे आवाहन अहिल्यानगर येथील अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सहाय्यक आयुक्त अर्पणा भोईटे यांनी केले. पंचायत समितीच्यावतीने शुक्रवारी येथील त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलात तालुक्यातील पुर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक विद्यालयांच्या सर्व व्यवस्थापनाचे मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका, ग्रामविकास अधिकारी यांच्यासाठी आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. या वेळी गटविकास विकास अधिकारी महेश दहिफळे, गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ, सहाय्यक गटविकास अधिकारी सचिन भाकरे, शिक्षण विस्तार अधिकारी रघुनाथ लबडे, त्रिमुर्ती संकुलाचे प्राचार्य शिवाजी काटे, संकुलाचे मानद विश्वस्त बाळासाहेब कोकरे आदी मान्यवर उपस्थित होते. गटविकास अधिकारी महेश दहिफळे, बाळासाहेब कोकरे, बालाजी गायकवाड, कृष्णमुरारी गाढे, सविता मरकड, सुनिल खैरे आदींनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन केंद्रप्रमुख नामदेव धायतडक यांनी केले. आभार केंद्रप्रमुख श्रीकृष्ण शेळके यांनी मानले.




# कळसपिंप्रीत वहिवाटीचा रस्ता तारेचे कुंपण घालून बंद

## ६०-७० घरांचा संपर्क तुटला



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कोरडगाव :** पाथर्डी तालुक्यातील कळसपिंप्री येथे दोन शेतकऱ्यांमधील शेतजमिनीच्या व वहिवाटीच्या रस्त्याच्या वादातून गावातील नागरिकांच्या ये-जा करण्याचा रस्ता तारेचे कुंपण घालून बंद करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकारामुळे परिसरातील सुमारे ६० ते ७० घरांतील नागरिकांची मोठी गैरसोय होत असून, ग्रामस्थांनी या प्रकाराला तीव्र विरोध केला आहे.

कळसपिंप्री येथील वहिवाटीच्या रस्त्यावर तारेचे कुंपण उभारून मार्ग बंद करण्यात आल्याने नागरिकांना पर्यायी मार्गाचा शोध घ्यावा लागत आहे. अनेक ग्रामस्थ सध्या शेतांच्या बांधावरून व गवतातून वाट काढत गावात ये-जा करीत आहेत. त्यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी तसेच विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

संबंधित दोन शेतकऱ्यांमध्ये एकमेकांच्या शेतात जाण्या-येण्यावरून वाद असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. मात्र, हा वाद सोडविण्याऐवजी वहिवाटीचा रस्ताच बंद केल्याने त्याचा फटका संपूर्ण परिसरातील नागरिकांना बसला आहे. दोन व्यक्तींमधील वादासाठी संपूर्ण गावाचा रस्ता बंद करण्याचा अधिकार कोणी दिला? असा सवाल संतप्त ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

### विद्यार्थ्यांचीही गैरसोय

रस्ता बंद झाल्याचा सर्वाधिक फटका शाळकरी विद्यार्थ्यांना बसत आहे. नियमित शाळेत जाण्यासाठी वापरला जाणारा मार्ग बंद झाल्याने गेल्या दोन दिवसांपासून काही विद्यार्थी शाळेत जाऊ शकले नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. विद्यार्थ्यांना धोकादायक व कष्टदायक पर्यायी वाटेने जावे लागत असल्याने पालकांमध्येही चिंता व्यक्त होत आहे.

### ग्रामस्थांचा तीव्र विरोध

रस्ता बंद करण्याच्या प्रकाराला दिगंबर सुधाकर भवार, सोमनाथ बबन बुळे, भाऊसाहेब भानुदास भवार, दादासाहेब बाबासाहेब बुळे, ज्ञानेश्वर गोवर्धन मिसाळ, बळीराम लक्ष्मण मिसाळ (सरपंच), संतोष रामनाथ मिसाळ, सुभाष लक्ष्मण मिसाळ, शिवाजी लक्ष्मण मिसाळ, संभाजी लक्ष्मण मिसाळ, मनोहर रावसाहेब मिसाळ, शेळके योगेश रामनाथ यांच्यासह ग्रामस्थांनी विरोध केला आहे.

ग्रामस्थांनी प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन घटनास्थळी पाहणी करावी, रस्ता नेमका कोणत्या प्रकारचा आहे याची कागदपत्रांच्या आधारे चौकशी करावी आणि नागरिकांची वहिवाट पूर्ववत करावी, अशी मागणी केली आहे.

दोन शेतकऱ्यांच्या वादाचा फटका संपूर्ण गावाला बसू नये, यासाठी महसूल विभाग व ग्रामपंचायतीने तातडीने हस्तक्षेप करून तोडगा काढण्याची गरज आहे. रस्ता बंद राहिल्यास नागरिकांच्या दैनंदिन जीवनाबरोबरच विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

## सामाजिक बांधिलकीने जागतिक फोटोग्राफर दिन साजरा!



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** जागतिक फोटोग्राफर दिनाचे औचित्य साधत कर्जत तालुका फोटोग्राफर संघटनेच्या छायाचित्रकार बांधवांनी आपल्या कलेसोबतच सामाजिक बांधिलकी जपत समाजसेवेचा अनोखा आदर्श निर्माण केला. राशीन येथील संस्कार बाल आश्रम तसेच आजोळ वृद्धाश्रम येथे सामाजिक उपक्रमाचे आयोजन करून अनाथ, निराधार मुलांसह ज्येष्ठ नागरिकांसोबत स्नेहपूर्ण वेळ घालविण्यात आला.

यावेळी आश्रमातील मुलांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन किराणा साहित्य, शैक्षणिक साहित्य, ब्लँकेट तसेच विविध आवश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. तसेच ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन आपुलकीचा अनुभव देण्यात आला.

छायाचित्र म्हणजे केवळ एखादा क्षण कॅमेऱ्यात टिपण्याचे माध्यम नसून, त्या क्षणामागील भावना, माणुसकी आणि सामाजिक जाणीव जपणारी सुंदर आठवण आहे. याच भावनेतून छायाचित्रकारांनी कलेला समाजसेवेची जोड देत माणुसकीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला. कलेसोबत समाजसेवाही महत्त्वाची हा प्रेरणादायी संदेश देत जागतिक फोटोग्राफर दिन सामाजिक बांधिलकीने साजरा करण्यात आला. या उपक्रमामुळे छायाचित्रकारांच्या सामाजिक संवेदनशीलतेचे दर्शन घडले. या उपक्रमास कर्जत तालुका फोटोग्राफर संघटनेचे पदाधिकारी, सभासद व छायाचित्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिक्षक विद्यार्थ्यांच्या हृदयातून कधीही सेवानिवृत होत नाही : डॉ. घुले

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**शहरटाकळी :** ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्यासाठी वाहून घेतले आहे. शिक्षक म्हणून त्यांचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी राहिला आहे.सेवानिवृत्ती म्हणजे कर्तव्यातून मुक्तता असली तरी शिक्षक कधीही विद्यार्थ्यांच्या हृदयातून सेवानिवृत्त होत नाही असे प्रतिपादन पंचायात समिती चे माजी सभापती डॉ. क्षितिजभैय्या घुले पाटील यांनी केले, शेवगांव तालुक्यातील शहरटाकळी येथील रहिवाशी भाविनिमगांव जिल्हा परिषद शाळेचे मुख्याधापक सुभाष , सिताराम शेटे यांच्या सेवापूर्वी निरोप संभारंभ कार्यक्रम शहरटाकळी येथे मोठ्या उत्सहात संपन्न झाला यावेळी अध्यक्ष स्थानावरून डॉ. क्षितिजभैय्या घुले बोलत होते. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी बाबासाहेब बुगे, शिक्षण विस्तार अधिकारी मा. डॉ. शंकर गाडेकर, गटाशीक्षणा अधिकारी शैलजा राऊळ , शिक्षक बँकेचे माजी व्हाईस चेअरमन रमेश गोरे, प्रभारी शिक्षण विस्तार अधिकारी रघुनाथ लबडे, केंद्रप्रमुख योगेश राजळे, ज्ञानदेव खरड, अनिल मडके, अशोकराव मेरड, उपस्थीत होते. यावेळी बोलतांना क्षितीज भैय्या घुले पाटील पुढे म्हणाले की, सरांचा कार्यकाळ सांगायला अतिशय अभिमान वाटतो ते शिक्षक कुटुंब म्हणून समाजासमोर त्यांनी अतिशय चांगल्या आदर्श ठेवला आहे की त्यांचे मुलं देखील त्यांनी डॉक्टर केलेले आहे शिक्षकांनी समाजाच्या आदर ठेवायचा असतो तसे एक आदर्श तुम्ही सर्वांसमोर असल्याचे सांगून त्यांच्या पुढील ऊज्वल आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. स्नेह भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## शेवगाव शहराचा बाह्य वळण रस्ता घेणार मोकळा श्वास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** शहरामधून जाणाऱ्या राज्यमार्ग क्रमांक ४४ म्हणजेच श्रीरामपूर शेवगाव गेवराई या बाह्य वळण रस्त्यावरील अतिक्रमण तात्काळ हटवून तो रस्ता मोकळा करण्याचे आदेश उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजी नगर खंडपीठाने दिले आहेत. खंडपीठाच्या आदेशाने नगरपालिका प्रशासन संबंधितांना नोटिसा पाठवून रस्ता अतिक्रमण मुक्त करण्यासाठी सरसवल्याने अतिक्रमणधारकात खळबळ उडाली आहे.

सविस्तर माहिती अशी की, शेवगाव शहराची वाढती लोकसंख्या, साखर कारखान्यामुळे होणारी वाहतूक तसेच धार्मिक ठिकाण मढी,मायंबा, मोहटादेवी या ठिकाणी येणाऱ्या भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे शेवगाव शहर कायम वाहतूक कोंडीत अडकले जात होते. शेवगाव शहराला राज्यमार्ग क्रमांक ४४ हा बाह्यवळण रस्ता दिला असला तरी तो पूर्ण न झाल्याने प्रचंड वाहतूक कोंडी होत होती. बाह्य वळण रस्ता पूर्ण करण्यासाठी अनेकवेळा बातम्या प्रसिद्ध करूनही हा रस्ता मोकळा होत नव्हता यासंदर्भात अनेक अर्ज विनंती या तक्रारी करूनही तो पूर्ण झाला नाही. सामाजिक कार्यकर्त्या सौ. रेखा अमोल नाईक, भ्रष्टाचार जनविरोधी आंदोलनाचे अध्यक्ष अमोल घोलप यांनी उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजी नगर खंडपीठात जनहित याचिका दाखल केली होती. बाह्य वळण रस्त्या संदर्भात विविध वृत्तपत्रातील बातम्यांचे सखोल निरीक्षण न्यायालयाने नोंदवून घेऊन सुनावणी केली. अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि शेवगाव नगरपालिकेच्या प्रशासक यांना राज्य मार्ग क्रमांक ४४ वरील सर्व अतिक्रमणे तत्काळ हटवण्याचे आदेश देऊन हा रस्ता सर्वसामान्य नागरिकांसाठी खुला करण्याचे आदेश दिले आहेत. उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजी नगर खंडपीठाने बाह्यवळण रस्त्याचे काम पूर्ण करण्याचे आदेश दिल्याने हा रस्ता लवकरच पूर्णत्वास येणार आहे. याचिकाकर्ते सौ. रेखा नाईक यांच्या वतीने एडवोकेट केतन पोटे व एडवोकेट अरविंद अंबेटकर यांनी न्यायालयासमोर युक्तिवाद केला. तर नगर परिषदेच्या वतीने एडवोकेट बटुळे यांनी कामकाज पाहिले.

## शिक्षक काशीद यांच्या उपक्रमांचा पुस्तक रूपाने प्रेरणादायी प्रवास



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खोसपुरी येथील शिक्षक मनोज काशीद यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील नाविन्यपूर्ण व विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांवर आधारित ‘उपक्रम वाटा’ या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.

माजी सरपंच सोमनाथ हारेर यांच्या अध्यक्षतेखाली हा प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी करीम बेग, बाबा शेख, मुबारक पठाण, कयूम शेख, आसाराम वाघमोडे, संभाजी भिसे, भीमराज आव्हाड, फकीर पठाण, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा रेश्मा बेग, उपसरपंच मीनाताई भालेराव तसेच अंबादास देवकर यांची प्रमुख उपस्थिती होती. शिक्षक मनोज काशीद यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या या उपक्रमशील कार्याचा अनुभव इतर शिक्षकांपर्यंत पोहोचावा आणि त्यांना आशा उपक्रमांसाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने ‘उपक्रम वाटा’ या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे.पुस्तकामध्ये विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आणि कृतीशील अशा विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली आहे. स्टुडंट ऑफ द डे, घर तिथे शिक्षण, रीडिंग बेल’, सोनू-मोनू बचत बँक यांसारख्या उपक्रमांचा पुस्तकात समावेश आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड, बचतीची सवय, जबाबदारीची जाणीव, आत्मविश्वास, स्वावलंबन, नेतृत्वगुण आणि जीवनकौशल्ये विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रकाशन सोहळ्यास शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा मुरकुटे, शिक्षक बाळासाहेब कदम, भीमराज आव्हाड, संजय जाधव, उषा कडूस, पद्मिनी चौधरे यांच्यासह शाळेतील शिक्षक, ग्रामस्थ, पालक व शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चार दिवसांच्या उपोषणानंतर पतसंस्थेच्या ऑडिटचे आश्वासन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पारनेर :** निघोज तालुका पारनेर येथील सचिन लाळगे या शेतकऱ्याचे श्रीसाई ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, पारनेर यांच्याविरुद्ध गेल्या चार दिवसांपासून चालू केलेले उपोषण त्यांच्या कर्ज प्रकरणाचे चाचणी लेखापरीक्षण करून देण्याच्या आश्वासनानंतर शुक्रवारी दुपारी मागे घेण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, निघोज येथील शेतकरी सचिन लाळगे यांनी भैरवनाथ पतसंस्थेकडून चार लाख रुपये कर्ज घेतले होते. पुढे ही पतसंस्था पारनेर येथील श्रीसाई ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेत विलीन झाल्यानंतर या पतसंस्थेने लाळगे यांच्याकडे सुमारे ६० लाख रुपये कर्ज रकमेची थकबाकी दाखवून वसुलीची कारवाई चालू केली होती. याप्रकरणी शेतकऱ्याची जमीन जप्त करून लिलावात काढली असताना लाळगे यांनी त्यास विरोध करत हरकत घेऊन त्यांच्या कर्ज प्रकरणाचे चाचणी लेखापरीक्षण झाल्याशिवाय वसुलीची कोणतीही कारवाई करू नये अशी भूमिका घेऊन पतसंस्थेच्या विरुद्ध सदर पतसंस्थेसमोर उपोषण चालु करण्याचा निर्णय घेतला होता. उपोषणकर्त्या शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार पतसंस्थेने अव्वाच्या - सव्वा बेकायदा व्याज लावून त्याच्या कर्जाचा फुगवटा निर्माण करून त्यांचेवर अन्याय केल्याचा आरोप करत त्यांनी उपोषणाला सुरुवात केली होती. पारनेर येथील सहकार विभागाच्या कार्यालयाने मध्यस्थी केल्यानंतर श्रीसाई ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेने अखेर या शेतकऱ्याला त्याच्या कर्ज प्रकरणाचे लेखापरीक्षण सहकार विभागाच्या तज्ज्ञांकडून करून घेण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर शेतकरी सचिन, लाळगे यांनी त्यांचे चार दिवसापासून चालू केलेले उपोषण मागे घेतले आहे.

# पत्रकारांवर हल्ले खपवून घेणार नाही : गाडगे

## सुशील थोरात हल्लाप्रकरणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची कडक कारवाईची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**पारनेर :** साम टीव्हीचे पत्रकार सुशील थोरात यांच्यावर जीवघेना हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांवर कडक कारवाई करावी या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने पारनेर पोलीस स्टेशनला एपीआय सोमनाथ दिवटे व पीएसआय रंजीत मारक यांनालेखी निवेदन देण्यात आले.

सध्या अहिल्यानगर जिल्ह्यात सर्वत्र गुंडगिरी वाढतच चालली असून या गुंडांनी पत्रकारांना सुद्धा सोडले नाही. अहिल्यानगरमध्ये सावेडीसह शहरात अवैध धंदे करणाऱ्या,नशेखोर टारगट तरुणांच्या टोळक्यांची दहशत दिवसें दिवस वाढत चालली असून, याच टोळक्याने साम टीव्हीचे पत्रकार सुशील थोरात यांच्यासह त्यांचा मुलगा सार्थक या दोघांवर पाईपलाईन रोडवरील एचडीएफसी बँकेसमोर गुरुवारी (दि. २० ऑगस्ट २०२६) सायंकाळी जीवघेणा हल्ला केला. ज्यांनी हा हल्ला केला त्याचे अवैध व्यवसाय असून थोरात यांनी त्यांच्या अवैध व्यवसायाची बातमी केली होती. तेव्हापासून ते थोरात यांच्यावर हल्ला करण्याची संधी शोधत होते. किरकोळ वाद उकरून हा हल्ला करण्यात आला. या जीवघेण्या हल्ल्यातून सुदैवाने सुशील थोरात आणि मुलगा बाल बाल बचावले आहेत.

यावेळी बोलताना महाराष्ट्राचे पत्रकार संघाचे उत्तर महाराष्ट्राचे अध्यक्ष तथा अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे म्हणाले, पत्रकाराला कुठलीही जात धर्म नसतो. तो प्रामाणिकपणे बातमीदारी करत असतो.आज सुशील थोरात यांच्यावर हल्ला झाला,उद्या आणखी दुसऱ्या पत्रकारावर वर हल्ला होईल. त्यामुळे पत्रकारांच्या पाठीमागे कोणीही नाही असं कोणी समजू नये.पत्रकारांवर हल्ले यापुढील काळात खपवून घेणार नाही. प्रसंगी पत्रकारांच्या संरक्षणासाठी रस्त्यावर येऊ.

त्यासाठी पत्रकारांच्या संरक्षणाच्या दृष्टीने हल्लेखोरांचा तात्काळ शोध लावून त्यांना अटक करावी आणि पत्रकार संरक्षण कायद्यानुसार त्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे कलम नोंदवून घेत त्यांचा जामीन होणार नाही, यापद्धतीने मकोका अंतर्गत त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी सर्व पत्रकारांच्या वतीने करण्यात आली. सदर हल्लेखोरां-विरोधात यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल आहेत.त्यांची पार्श्वभूमी ही गुन्हेगारी स्वरूपाची असून, हल्लेखोरांवर ‘मकोका’ सारखी कारवाई करावी, अशी आमची विनंती आहे. हल्लेखोरांना कडक शासन करण्यात यावे जेणेकरून पुन्हा ते अशा पद्धतीचा गुन्हा करणार नाहीत.

यावेळी पत्रकारांनी दिलेले निवेदन स्वीकारल्यानंतर बोलताना पारनेरचे पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ दिवटे म्हणाले, साम टीव्ही चे पत्रकार सुशील थोरात यांच्यावर हल्ला झालेला आहे. त्या संदर्भात राज्य पत्रकार संघाने जे निवेदन दिलेले आहे ते निवेदन आम्ही वरिष्ठांना पाठवत आहोत. तसेच त्या हल्लेखोरांवरती कडक कारवाई करून पत्रकारांवरती यापुढील काळात अशा प्रकारचा कुठलाही हल्ला होऊ नये याबाबतची दक्षता घेऊ. आणि पत्रकारांना संरक्षण देण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन दिले.

याप्रसंगी दत्ता गाडगे, विनोद गायकवाड, संतोष तांबे, श्रीनिवास शिंदे, भगवान गायकवाड आदींसह पत्रकार बांधव उपस्थित होते.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री



# निस्वार्थ प्रेमातूनच भक्ती दृढ होते

## प्रेम हे मुक्तीचा मार्ग : महंत रामगिरी महाराज

### नेतेमंडळींनी घेतला आमटी-भाकरीचा प्रसाद

नेवासा तालुक्यातील सामूहिक पंगतीच्या निमित्ताने आमदार, खासदारांसह विविध राजकीय नेते कार्यकर्त्यांसह उपस्थित राहिले. डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रवरा उद्योग समूहाच्या वतीने १०१ पोती साखर देण्याची घोषणा केली. माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या वतीने अशोक कारखान्याचे संचालक नीरज मुरकुटे यांनी एक लाख रुपयांची मदत जाहीर केली.





प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगाव** : कुठलातरी उद्देश ठेवून भक्ती केली आणि तो उद्देश पूर्ण झाला नाही, तर श्रद्धा डळमळते. मात्र, कोणताही स्वार्थ किंवा उद्देश न ठेवता केलेले प्रेमच श्रद्धापूर्वक टिकते, असा उपदेश महंत रामगिरी महाराज यांनी केला. योगीराज सद्गुरू गंगागिरी महाराज यांच्या धनगरवाडी पंचक्रोशीतील अखंड हरिनाम सप्ताहाच्या पाचव्या दिवशी प्रवचनाचे चौथे पुष्प गुंफताना ते बोलत होते. श्रावणी शनिवार असल्याने सप्ताहस्थळी सहा लाखांहून अधिक भाविकांनी गर्दी केली होती. आमटी-भाकरी महाप्रसादासाठी रात्री ९ वाजेपर्यंत १८ टँकर आमटीचा वापर झाला. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता रात्री ११ वाजेपर्यंत आणखी एका टँकरची आवश्यकता भासण्याची शक्यता होती.

भाकरी कमी पडू नये यासाठी १० क्विंटल तांदूळ शिजविण्यात आला. महंत रामगिरी महाराज यांनी ज्ञानेश्वरीतील ओव्यांचा संदर्भ देत प्रेम, भक्ती आणि अनासक्तीचे महत्त्व स्पष्ट केले. संसार हा उलटा अश्वत्थ वृक्ष असून त्याची मुळे वर आणि फांद्या खाली आहेत. हा वृक्ष तोडण्याचे शस्त्र म्हणजे अनासक्ती आणि प्रेम होय, असे त्यांनी सांगितले. निस्वार्थ प्रेमाने भगवंताचे स्मरण केल्यास तेच प्रेम भक्तीत रूपांतरित होते. युवकांनी संस्कार आणि भक्तीची सांगड घालून जीवन जगावे, असे आवाहनही त्यांनी केले. या वेळी डॉ. सुजय विखे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार अमोल खताळ, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

तसेच योगीराज सद्गुरू गंगागिरी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता सोहळ्यास दि. २५ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित राहणार असल्याची माहिती डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.

### तृतीयपंथीयांचा सत्कार

सप्ताहासाठी श्रीरामपूर शहरातून सर्वधर्मीय नागरिकांकडून भाकरी व देणगीच्या माध्यमातून मदत केली जात आहे. या सेवेत योगदान देणाऱ्या तृतीयपंथीयांचा महंत रामगिरी महाराज यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. श्रीरामपूर सद्गुरू गंगागिरी महाराज भक्त मंडळाच्या वतीने वार्डनिहाय भाकरी संकलनाचे केलेले नियोजनही महाराजांनी कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

# चांदबिबी महाल परिसरात बिबट्याचे दर्शन, नागरिकांमध्ये भीती



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : शहरालगतच्या ऐतिहासिक चांदबिबी महाल परिसरात गुरुवारी (दि. २१) रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास बिबट्याचे दर्शन झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाल परिसरात गेलेल्या आकाश वाळके यांच्यासमोर अचानक बिबट्या आल्याने काही काळ थरारक परिस्थिती निर्माण झाली. वाळके यांनी हालचाल न करता प्रसंगावधान राखत बिबट्याचा व्हिडिओ मोबाईलमध्ये चित्रित केला. या घटनेला 'हरियाली' पर्यावरण संस्थेचे अध्यक्ष सुरेश खामकर यांनी दुजोरा दिला आहे. व्हिडिओमध्ये बिबट्याचे चमकणारे डोळे आणि हालचाली स्पष्टपणे दिसत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे. चांदबिबी महाल परिसरात दिवसभर पर्यटकांची मोठी वर्दळ असते.

तसेच शहरातील नागरिक पहाटे व सायंकाळी व्यायाम व चालण्यासाठी येथे येतात. मेहेकरी, भिंगार, आगडगाव आणि रतडगाव परिसरातील शेतकरी, दुग्ध व्यावसायिक, पोल्ट्री व्यावसायिक, कर्मचारी तसेच विद्यार्थीही या मार्गाचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

या परिसरात यापूर्वीही बिबट्याचा वावर आढळून आला आहे. त्यामुळे वन विभागाने तातडीने पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, तसेच बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. रात्रीच्या वेळी नागरिकांनी या परिसरात जाणे टाळावे, असे आवाहनही करण्यात येत आहे.

# वैजापूरात कचोरीत आढळल्या उंदराच्या लेंड्या

## 'भवानी राजस्थान स्विट्स' विरुद्ध 'एफडीए'कडे तक्रार



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत आणि स्वच्छतेबाबत एक अत्यंत गंभीर प्रकार वैजापूर शहरात समोर आला आहे. येथील दापो रोडवर असलेल्या 'भवानी राजस्थान स्विट्स' या प्रसिद्ध मिठाईच्या दुकानातून घेतलेल्या कचोरीमध्ये थेट उंदराच्या लेंड्या आढळल्याचा खळबळजनक आरोप एका ग्राहकाने केला आहे.

दि. २२ ऑगस्ट रोजी सम्राट तांबूस नावाच्या ग्राहकाने या दुकानातून कचोरी खरेदी केली होती. मात्र, कचोरी खाण्यासाठी फोडली असता त्यात उंदराची विष्ठा दिसून आल्याने ग्राहकाला मोठा धक्का बसला. खाद्य पदार्थातील या गंभीर अस्वच्छतेमुळे ग्राहकांच्या आरोग्याशी थेट खेळ खेळला जात असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तक्रारदार सम्राट तांबूस यांनी अन्न व औषध प्रशासन (ऋऊ-) आणि अन्न सुरक्षा विभागाकडे ई-मेलद्वारे तत्काळ तक्रार नोंदवली आहे. दूषित अन्नामुळे नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो, त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दुकानदारावर अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत कडक कारवाई करण्याची मागणी त्यांनी पत्रात केली आहे.

तसेच या घटनेचे आवश्यक फोटो, व्हिडिओ आणि खरेदीचे बिल प्रशासनाला पुरावा म्हणून देण्याची तयारीही त्यांनी दर्शवली आहे. या प्रकारामुळे वैजापूरमधील खवय्यांमध्ये मोठी घबराट पसरली असून, एफडीए आता या आस्थापनेवर काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# २ तासांच्या चार्जिंगवर धावणारा देशातील पहिला ट्रॅक्टर शिर्डीत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



## कोल्हे कारखान्याची खरेदी

**शिर्डी** : प्रसिद्ध मुरुगप्पा समूहाच्या मॉन्टेरा या कंपनीने तयार केलेला आणि भारतातील पहिला एआरएआय-प्रमाणित ४५ एचपी क्षमतेचा इलेक्ट्रिक ट्रॅक्टर महाराष्ट्रात दाखल झाला असून कोपरगाव येथील सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याने हा पहिलाच इलेक्ट्रिक ट्रॅक्टर खरेदी केला आहे. आज शिर्डी येथील साईबाबा मंदिराच्या गेट क्रमांक ४ समोरील परिसरात या इलेक्ट्रिक ट्रॅक्टरची विधिवत पूजा करण्यात आली असून आ . विवेक कोल्हे यांच्या हस्ते हा विधी पार पडला.

याप्रसंगी बोलताना आमदार कोल्हे यांनी डिझेल आणि पेट्रोलच्या वाढत्या दरांचा उल्लेख करत, इंधनाचे वाढते दर पाह हा ट्रॅक्टर शेतकरी आणि साखर कारखान्यांच्या वाहतूक कामांसाठी अत्यंत फायदेशीर पर्याय ठरत असल्याचे सांगितले तसेच केवळ दोन तासांच्या चार्जिंगवर हा ट्रॅक्टर सहजपणे ८० ते १०० किलोमीटरचे अंतर कापू शकतो असा दावा केला. हा इलेक्ट्रिक ट्रॅक्टर सामान्य ४५ एचपी डिझेल ट्रॅक्टरइतकीच किंवा त्याहून अधिक ताकद आणि टॉर्क देतो, ज्यामुळे शेतीची आणि वाहतुकीची कठीण कामे करणे अधिक सोपे होते, असे ते म्हणाले.

केंद्र सरकार या तंत्रज्ञानासाठी आधीच अनुदान देत असले तरी, महाराष्ट्र सरकारनं या विषयाचा गांभीर्यानं विचार करून अनुदानाची रक्कम वाढवल्यास राज्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा आणि लाभ मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आणि मॉन्टेराचे अभिनंदन करून शेतकरी वर्गाच्या हितासाठी कंपनी अशीच नाविन्यपूर्ण व पर्यावरणपूरक उत्पादने सादर करत राहील, अशी आशा व्यक्त केली.

# नान्नजच्या तलाठ्याला खंडणीची मागणी

## जामखेडमध्ये दोन गुन्हे दाखल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जामखेड** : नान्नज येथील तलाठी प्रितम आशोक खाडे यांना दरमहा ५ हजार व याच गावातील संदिप नानाजी भवळ यांना घरे पाडायची नसतील तर प्रत्येकी १ लाख रुपयांची खंडणी मागितल्या प्रकरणी जामखेड पोलीस ठाण्यात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या फिर्यादीनुसार महादेव अरुण साठे यांच्या सह एकुण ७ जणांवर जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खंडणी मागितल्याच्या या प्रकारावरून जामखेड तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, नान्नज गावचे तलाठी प्रितम आशोक खाडे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, सन २०२३ पासून नान्नज येथे तलाठी म्हणून कार्यरत आहेत. १९ ऑगस्ट रोजी सकाळी कार्यालयीन शासकीय कामकाज करत असताना आरोपी महादेव अरुण साठे, विशाल साठे, अलोक राजू साठे आणि आकाश राजू साठे (सर्व रा. नान्नज ता. जामखेड ) हे चौघे तलाठी कार्यालयात आले व प्रीतम खाडे यांना म्हणाले की, 'नान्नज येथे काम करायचे असेल तर दर महिन्याला ५ हजार रुपये द्यावे लागतील', अशी मागणी केली. पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपींनी शिवीगाळ करत माहिती अधिकाराचे अर्ज देण्याची आणि खोटा ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. याचवेळी आरोपी महादेव अरुण साठे याने नारळ तोडण्याचा कोयता दाखवून पैसे देण्याची धमकी दिली आहे. या धमकीमुळे घाबरून आपण ५ हजार रुपये दिल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. त्यानंतर आरोपींनी कार्यालयातील शासकीय दस्तऐवज ओढून घेत इतरत्र फेकून दिले. तसेच शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला. तसेच दुसऱ्या घटनेत जामखेड पोलिस ठाण्यात संदीप नानाजी भवाळ (वय ६२, रा. अण्णाभाऊ साठेनगर, नान्नज, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आरोपी महादेव अरुण साठे, भाऊसाहेब साहेबराव साठे, संदीप बाबुराव साठे आणि गौतम भिकाजी साठे ( सर्व रा. नान्नज, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर ) यांनी दि.१७ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजता, तसेच २१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजता आणि रात्री ८ वाजता, नान्नज येथील फिर्यादीच्या घरासमोर आरोपींनी शिवीगाळ करत समाज मंदिराच्या जागेत बांधलेली घरे पाडून समाज मंदिराची जागा मोकळी करून द्यावी, अन्यथा एकेकाला तोडून टाकीन, तसेच समाज मंदिराच्या जागेत बांधलेली घरे पाडायची नसतील तर प्रत्येकी एक लाख रुपये द्यावे लागतील, असे सांगून फिर्यादीला शिवीगाळ करण्यात आली.

# बॅटरी चोरीतील आरोपी २४ तासात जेरबंद, राहुरी पोलिसांची कारवाई



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : देवळाली प्रवरा येथील गोदामाचे कुलूप तोडून दोन बॅटऱ्या चोरीला गेल्याच्या घटनेचा राहुरी पोलिसांच्या डीबी पथकाने अवघ्या २४ तासांत छडा लावला. चोरीप्रकरणी देवळाली प्रवरा येथील इस्लामपूरा भागातील जैद मुस्ताक सय्यद यास पोलिसांनी अटक केली असून, त्याच्याकडून चोरीस गेलेल्या दोन्ही बॅटऱ्या हस्तगत करण्यात आल्या आहेत.

याबाबत देवळाली प्रवरा येथील किरण पठारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत संशयिताचा शोध घेतला. डीबी पथकाने कौशल्यपूर्ण तपास करत आरोपीला २४ तासांच्या आत जेरबंद केले.

दरम्यान, या चोरीच्या प्रकरणामागे मोठी साखळी असण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तविण्यात येत असून, आरोपीकडे अधिक चौकशी सुरू आहे.

ही कारवाई राहुरी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाचे प्रवीण बागुल, बाबासाहेब शेळके, प्रमोद ढाकणे, अंकुश भोसले, सचिन ताजने, सतीश कुऱ्हाडे, संदीप रोकडे यांनी केली आहे.

# बेलवंडीतील बिंगो-मटका धाड प्रकरणाची चौकशी सुरु

## योग्य कारवाई करणार : सहा. पो. नि. नंदकुमार सोनवलकर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : बेलवंडी पोलीस ठाण्यापासून अवघ्या ५०० मीटर अंतरावर सुरू असल्याचा आरोप असलेल्या कथित बिंगो-मटका अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकल्याच्या प्रकरणाने आता वेगळे वळण घेतले आहे.

धाडीनंतर गुन्हा दाखल न झाल्याने तसेच कारवाईच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर पोलिस प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे.

या प्रकरणात नेमकी वस्तुस्थिती काय आहे, व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या प्रकाराची सत्यता किती आहे आणि संबंधित ठिकाणी पोलिसांकडून करण्यात आलेल्या कारवाईची कायदेशीर प्रक्रिया योग्य पद्धतीने झाली का, याबाबत आता चौकशी करण्यात येत आहे. यासंदर्भात बेलवंडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी पोलिस प्रशासनाची भूमिका स्पष्ट केली.

सदर प्रकरणी तसेच व्हायरल व्हिडिओच्या पार्श्वभूमीवर सध्या सखोल चौकशी सुरू आहे. चौकशीचा अहवाल पूर्ण झाल्यानंतर आणि चौकशीअंती निष्पन्न होणाऱ्या बाबींनुसार वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे सोनवलकर यांनी सांगितले.

याच पार्श्वभूमीवर संबंधित प्रकरणात कथित हप्ता वसुलीच्या चर्चांनाही उधाण आले होते. मात्र, या आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही. त्यामुळे चौकशीत उपलब्ध पुरावे, व्हिडिओ आणि प्रत्यक्ष परिस्थितीच्या आधारे वस्तुस्थिती समोर येणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### धाडीनंतर कारवाईवर प्रश्नचिन्ह

बेलवंडी येथील एका कथित बिंगो-मटका अड्ड्यावर पोलीस कर्मचाऱ्यांनी भेट दिल्याचा आणि पाहणी केल्याचा व्हिडिओ समोर आला होता. मात्र, त्यानंतर पंचनामा, जप्ती किंवा गुन्हा दाखल झाल्याची माहिती समोर न आल्याने या कारवाईबाबत प्रश्न उपस्थित झाले होते.

### वरिष्ठांच्या निर्णयाकडे लक्ष

पोलीस प्रशासनाने चौकशी सुरू असल्याचे स्पष्ट केल्याने आता या चौकशीत नेमके काय निष्पन्न होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. चौकशीअंती दोष आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर किंवा प्रशासकीय कारवाई होते का, तसेच आरोपांमध्ये तथ्य नसल्यास त्याबाबत पोलिस प्रशासनाकडून काय स्पष्टीकरण दिले जाते, हेही महत्त्वाचे ठरणार आहे.बेलवंडी परिसरातील अवैध मटका-बिंगो किंवा तत्सम प्रकारांना आळा घालण्याची जबाबदारी पोलिस प्रशासनाची असून, या प्रकरणातील चौकशी निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने होण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. आता चौकशीचा अहवाल काय सांगतो? याकडेच संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# कुंभेफळ येथे चिमुकल्यावर बिबट्याचा हल्ला; डोक्याला गंभीर दुखापत



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : अकोले तालुक्यातील कुंभेफळ येथे घराजवळ खेळत असलेल्या चार वर्षीय चिमुकल्यावर बिबट्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. अंकुर प्रशांत कोटकर असे जखमी बालकाचे नाव असून, बिबट्याने त्याच्या डोक्याला चावा घेतल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अंकुर हा दुपारी साडेतीनच्या सुमारास घराजवळ असताना अचानक बिबट्याने त्याच्यावर हल्ला केला. बिबट्याने त्याच्या डोक्याला चावा घेतला. कुटुंबीयांनी आरडाओरड केल्यानंतर बिबट्याने घटनास्थळावरून धूम ठोकली. जखमी अंकुरला तातडीने सुगाव येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

मात्र, डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने पुढील उपचारासाठी त्याला संगमनेर येथील मेडिकव्हर रुग्णालयात हलविण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे. कुंभेफळ तसेच प्रवरा परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्यांचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. त्यामुळे वनविभागाने तातडीने उपाययोजना करून बिबट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, सामाजिक कार्यकर्ते सुमित डेंगळे यांनी घटनेची माहिती अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या कार्यालयास तसेच संगमनेर मतदारसंघाचे आमदार अमोल खताळ यांना दिली. माहिती मिळताच मंत्री विखे पाटील व आमदार खताळ यांनी संबंधित वनविभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने मदतकार्य व आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. नागरिकांनी लहान मुलांना एकटे बाहेर सोडू नये, तसेच रात्रीच्या वेळी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.